REGISTERED N. N

साल अखेर ,, ७ ,, १ ८४
किरकोळ अंकास ............४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस............८१ ०६
दुसरे खेपेस .... ........८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Single copy ..........................4 as
Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line... 3 as

VOLXXXV AKOLA MONDAY 4 MARCH 1901 NO 9

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख ४ माहे मार्च सन १९०१ इ० अंक ९

## जाहिरात

ज्या अर्जदारांनीं सेन्सस ऑफिसांत नौकरी मिळण्याकरितां अर्ज केले आहेत त्यांनीं व दुसऱ्या अशा उमेदवारांनीं उमरावती येथें सेन्सस आफिसांत हजर होऊन तारीख ६ मार्चच्या सुमारापासून आठ दिवस बिन पगारानें ऍबस्ट्रॅक्शन व टॅबुलेशनचें काम शिकावें. त्यानंतर योग्य ठरतील यांना ठेविलें जाईल. पगार वगैरे संबंधानें माहिती समक्ष सेन्सस आफिसांत दिली जाईल.

A. D. Chinoy.

क्यांप बुलडाणें ता० १५।२।०१ } सुपरिंटेंडेंट आफ सेन्सस आपरेशन्स मुलुख अमानीं हैदराबाद

## मोरोपंत

निवडक वेंचें ( सावित्री आख्यान समाप्त )

( सत्संगतीची आणि गृहस्थाश्रमाची सावित्रीनें स्तुती केली तीस मानवून )

धर्म ह्मणे ' बाई ! मदालसा[1] धन्या ।
कीं[2] तूं ; नसे अन्या[3] आढळली ॥ १७४
रोमांच माझीया देहीं ऊभारती ।
तुझी सुभारती[4] आकर्णितां[5] ॥ १७५
पती विना देतो एक वर मार्गे ।
जा फिरोनी मार्गे भागलीस ॥ १७६

( आपल्या सासऱ्याचें वृद्धत्व व अंधत्व जाऊन त्याचा भाग्योदय व्हावा, असें सावित्रीनें मागून घेतलें व संतसमागमाचा महिमा आणखी वर्णिला )

यम ह्मणे ' बाई तुझी दिव्य दृष्टी ।
अमृताची वृष्टि तुवां केली ॥ १८४
बोलतीस तैसें श्रुतीनें[6] बोलावें ।
ऐकतां डोलावें जडांनीं ही ॥ १८५
वेधीलों विधीला[8] बाई ! बोल तुझा ।
पती विना दूजा वर मार्गे ॥ १८६

( सासऱ्याचें गेलेलें राज्य त्यास मिळावें असें मागून सावित्रीनें, संताची, व सर्व संताचें श्रेष्ठत्व यमधर्मास देऊन त्याची परम स्तुती केल्यावर )

यम ह्मणे, ' जशी तान्हेल्यासी सुधा ।
तुझी वाणी बुधा मज तशी ॥ २००
पती विना इष्ट वर माग तीजा ।
परं[10] मागती[11] जा श्रमी न हो ॥ २०१

( आपल्या पित्याला शंभर पुत्र व्हावे असें तिनें मागून घेतलें. तिचें निस्सीम पतिप्रेम, अत्यंत शुद्धाचरण, धर्मनिष्ठा, दृढनिश्चय, व समयोचित भाषण, यांहीं करून यमधर्म मोहित झाला, आणि चवथा वर देण्यास सिद्ध झाला. तरी तिनें पति परत मागूं नये, अशी त्यानें आपली इच्छा दर्शविली. व सावित्रीनें वरदान घेऊन परत जावें असा आग्रहानें पण मधुर भाषणें बोलून तो निरोप देऊं लागला )

१ एक ब्रह्मनिष्ठ राजपत्नी. २ किंवा तूं एक धन्य आहेस. ३ आणखी कोणी धन्य नाहीं. ४ वाणी भाषण. ५ ऐकतां. ६ वेदानें ७ मोहून टाकील. ८ ब्रह्मदेव ९ शहाणपणाची १० परंतु ११ परत.

यम ह्मणे, ' बाई ! धन्या तूं सुशीला ।
आलीस कुशीला जीच्या ती ही ॥ २१०

( सावित्री चवथा वर मागून घेते )

चित्राश्वोची जाया योग्य पुत्र शत ।
पावे', सतीव्रत स्वैस्थ राहो ॥ २१५
ह्मणे दिले पुत्र शंभर हिताचे ।
दंभरहिताचे धर्म जैसे ॥ २१६
आतां तरी बाई ! सावित्री ! परतें ।
भूमीला मरें तें झालें शव ॥ २१७

( इतकें झालें तरी, शास्त्रांतील रहस्यें पुढें करून, व गोडगोड बोलून आपल्या अलौकिक चातुर्यानें, धर्म राजाची प्रसन्नता संपादण्याचा तिचा क्रम एक सारखा चालूंच होता. )

यम ह्मणे, ' वीणी नव्हे बोलकी ती ।
बाई ! बोल किती तुझे वर्णू ॥ २२१
तुज वर्णावया नाहीं मज शक्ती ।
तुझे ठायीं भक्ति माझी झाली ॥ २२८
पांचवा अद्भुत वर महाभागे ! ।
मान न हा मागे वर देतां ॥ २२९
सावित्री ह्मणें बा ! देवा ! वरदान ।
तुझें; वरदा ! न व्यर्थ व्हावें ॥ २३०
स्व-सत्य सांभाळा मत्पती वाचवा ।
द्या वर पांचवा हाचि मज ॥ २३१
स्वर्गीं भाग्य सुख शतपुत्र जीणें ।
नको पतीविणें मज देवा ! ॥ २३२
वांचावावा माझा भर्ता सत्यवंत ।
देवा ! सत्यवंत त्वांही व्हावें ॥ २३३
शतपुत्र वर दयेनें देऊनी ।
पतीला घेऊनी कसा जाशी ? ॥ २३४
धर्म ह्मणे, ' बाई ! प्रताप हा मला ।
जिंकिलें त्वां मला पतिव्रते ॥ २३५
मार्कंडेया जशी तारी शंभूभक्ती ।
तशी तुझी शक्ती सत्यवंता ॥ २३६
बाई ! त्वां तुझा हा भर्ता केला मुक्त ।
याशीं तूं हो युक्त चिरकाल ॥ २३७

\+ \+ × \+

महाराष्ट्र भाषाभिज्ञ, महापंडित, कविश्रेष्ठांच्या प्रासादिक ग्रंथांतील हे उतारे, महाराष्ट्र भाषेचें मार्मिक ज्ञान संपादन करण्यास पूर्ण सहाय्यकारी होतील अशा समजुतीनें देण्याचा हा उद्योग आरंभिला आहे. तो सज्जनांस मान्य होवो.

वि०

१ मातेच्या. २ ह्मणजे सावित्रीच. ३ सुखरूप ( पातिव्रत्याला भंग न येवो ) ४ ओझें. ५ सरस्वती.

## मुख सामुद्रिक

नंबर ३

ज्यांच्या भिवया अस्पष्ट व बारिक असून पापण्यांचे केश पातळ व विरळ असतात ते अशक्त व उदास असतात. खोल व लहान निळे डोळे असून कपाळाचा कडा मोठा असला ह्मणजे तो मनुष्य आप्पलपोट्या व निर्दय असा समजावा. ज्यांचे डोळ्यांतील बुबुळ दिसून खालची व वरची पांढरी जागा ही दिसते ते अस्थिर व कोणत्याही विषयावर पूर्ण विचार करण्यास नालायक असे असतात. चैनी लोकांचे डोळे स्थीर असून पापण्या जाड असतात. बुद्धिमान लोकांचे डोळे बहुधा वाटोळे नसतात पण अशा डोळ्यांचे लोक मायाळू, सत्यप्रिय व निरुपद्रवी असतात. ज्यांचे डोळे बारिक पण पाणीदार व तीक्ष्ण असतात ते लुच्चे व असत्यभाषण करणारे असे असतात. ज्यांचे डोळे दूर दूर असतात ते सत्य व प्रामाणिक असतात. पण तेंच अंतर फार असल्यास ते मूर्ख व खुळे असण्याचा संभव असतो. ज्यांचे डोळे चांगले उघडलेले, पापण्या गुळगुळीत व दृष्टी स्थीर व ठाम असते ते लोक सचोटीचे असतात. डोळ्यांच्या कोपऱ्यांच्या बाहेर आखांवर पुष्कळ रेषा असल्यास ते विनोदी व हसरे असें समजावें.

भुवया—ह्या आनंदवृत्ती असतांना अभिवचन देणाऱ्या इंद्रधनुष्या प्रमाणें दिसतात व त्याच वृत्ती कुपित झाल्यास सज्यचाप धनुष्याकार बनतात. भुवयांचेहि प्रकार अनेक आहेत. लॅव्हेटरनें बारा सांगितले आहेत. उत्तम भिवई ह्मटली ह्मणजे जी नाकापासून कान कडे जातांना प्रथम अगदीं सरळ व आडवी असून शेवटास किंचित वर व मागे चढलेली असते. पुरुषांच्या भिवया बहुधा सरळ असतात. बायकांच्या कमानदार असतात. बुद्धिमान व शोधक लोकांच्या भिवया जाड, मोठ्या व केसाळ असतात. याचे प्रत्यंतर कारलाईल्, ग्लड्स्टन्, लिव्हिंग्स्टन्, व साल्व्हेशन् आर्मीचे जनरल बुथ यांचे फोटो पाहिले असतां कळेल. ज्यांच्या भिवया कमानदार असून कोणताही पदार्थ पाहिल्याबरोबर वारंवार वर कपाळाकडे चढतात त्या लोकांना आश्चर्य तेव्हांच वाटतें; राग लवकर येतो; बरे वाईट मनोविकारांचे त्यांजवर तेव्हांच वर्चस्व बसतें. ग्रंथकार असें ह्मणतात कीं मी आजपर्यंत ५००० वर फोटो तपासून त्या त्या माणसांमाणसांचे स्वभाव निदर्शन केलें व त्यांत मला असें आढळून आलें आहे कीं ज्याचे भिवईचें बाहेरील टोक व डोळ्यांचा कोन यां मधील ज्यांची जागा फुगीर असते ते दारूबाज असतात. ते स्वतः नसतील तर बाप आजे तरी पूर्वी कुळांत तसे झालेले असतात. त्याच प्रमाणें ज्यांची डोळ्यांची खालची पापणी सुजीर असते त्याना कोणता तरी काळजाचा विकार असतो. स्त्रियांत वरच्या पापण्या मोठ्या, ह्मणजे लांब व खालपर्यंत पडणाऱ्या असणें हा एक सौंदर्याचा भाग गणला आहे. आपल्या संस्कृतांत सुद्धां सुंदर स्त्रियांचें वर्णन ' पक्ष्मलाक्षी ' ह्मणून केलेलें आहे. अशा पापण्यांच्या स्त्रिया बहुधा विनयशील असतात. पण कांहीं नुक्तता तसा अविर्भाव करितात हे ही लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. जे लोक डोळ्यांच्या कोपऱ्यांतून पाहतात त्यांच्या विषयीं फार सावध असावें. कारण ते लुच्चे व भामटे असतात जे लोक बोलतांना डोळे मिटल्यासारखे करून ईश्वराविषयीं, पवित्रते विषयीं, व आपल्याच सत्कर्माविषयीं बोलतात अशा लोकांनीं कांहीं पैसा वगैरे मागितल्यास पैशाची पिशवी उघडली असल्यास बंद करावी अशी ग्रंथकारांची सूचना आहे. डोळे अर्धवट मिटणें, ज्यांशीं बोलणें चाललें आहे त्याजकडे न पाहतां दुसरीकडे पाहून बोलणें, बाजूनें ह्मणजे कोपऱ्यातून पाहणें, अगर भिवया खेंचून पाहणें हीं, जेव्हां या कृती करणारांची प्रकृती बिघडलेली नसेल त्यावेळीं कावेबाजपणाची व लुच्चेपणाची चिन्हें समजावींत. अशा माणसांवर कधी ही विश्वास ठेवूं नये; मग त्यांचा दर्जा, विद्वत्ता, अगर योग्यता कांहींही असो. प्रामाणिकपणाचें लक्षण Let thine eyes look right on या वाक्यांत आहे.

गाल—यांचा संबंध फुप्फुसें, यकृत, जठर, व हृदय यांच्याशी असतो. त्यांच्या आंतील रोगी व निरोगी स्थितीवर गालांचा वर्ण, आकार व वर येणें अगर खालीं बसणें हीं अवलंबून असतात. त्यांची अंतरवस्था कशी आहे हें गालांवरून समजतें. ती बरी नसली ह्मणजे गालही खोल गेलेले दिसतात. लगेच त्या त्यांच्या रोगी अंतरवस्थेचा त्या मनुष्याच्या स्वभावावर परिणाम घडतो. ज्या वेळीं फुप्फुसें पूर्ण निरोगावस्थेंत असतात त्या वेळीं रुधिराभिसरणही जोराचें असतें; त्या मुळें स्वभावांत हुरूप, व उमेद हीं दृष्टीस पडतात. गाल वर येतात, वर्ण तांबुस होतो व तींच फुप्फुसें जर अशक्त असलीं तर चेहेऱ्यातील सर्व स्नायू बारिक व निःशक्त असतात व वर्ण फिक्का दिसतो. ह्मणूनच कोणच्याही उद्योगांत यश मिळण्यास गालावर लागतात ह्मणून इंग्लंडांतील खालच्या दर्जाच्या लोकांत एक ह्मण आहे. ती कांहीं वृथा नाहीं आपल्या लोकांतही असें ह्मणतात कीं गुळाची ढेप मुंगळा नेईल कीं नाहीं हें त्याच्या कमरे वरूनच कळतें. उघडच आहे कीं शरीरांत जर जोम नसला तर मनांत-ह्मणजे स्वभावांत-तरी जोम कोठून असणार ? व मनांत जर जोम नसला तर बुद्धिसामर्थ्य, कर्तृत्वशक्ति पाठशक्ति, हीं यावींत कुठलीं ! किंग्सले यांचे वाक्य तर सर्व विश्रुतच आहे, Mentem sanum, in corpori sano *i. e.* there can be no sound mind without a sound body. चांगले उंचलून आलेले गाल, हे शारिरीक व मानसिक सामर्थ्यास अत्यवश्य आहेत हें बिस्मार्क, लिव्हिंगस्टन्, स्टॅनले, गारफील्ड, व ब्रॅडलॉ यांचे फोटोवरून कळेल. ज्या लोकांचे गाल नाकापेक्षां मोठे ह्मणजे उंच असतात त्यांमध्यें शक्ती असल्यापेक्षां जास्त दिसते व

सामर्थ्यें बुद्धिसामर्थ्यापेक्षां पोरकटपणा जास्त असतो. जे लोक गाल खोल असूनही मोठ्या योग्यतेस चढतात त्यांची इकडील उणीव वरिष्ट व उत्कृष्ठ मतीच्या डोक्यानें व जास्त मोठ्या नाकानें भरून आलेली असते. अशीं उदाहरणें ह्मटलीं. ह्मणजे न्यूमन्, सरजॉनूंत्र लुबॉक्, बूथ, व Review of Reviews या मासिक पुस्तकाचे चालक Mr. William Stead हीं होत. अशीं माणसें बहुधा Pen is mighter than the sword या वर्गांतली असतात कारण बुद्धिसामर्थ्याचींच लक्षणें त्यांच्यांत जास्त पूर्णावस्थेस आलेलीं असतात. मनुष्याचा चेहेरा फिक्का पडणें हें त्याच्या ह्रदयाला कोणती ही गोष्ट चटकर लागते याचें दृश्य लक्षण आहे. पण हें काळ्या माणसांत लक्षांत येणें जरा कठीण आहे. ज्या मनुष्यांचे चेहेऱ्यावर मनोविकारांचें चित्र चटकर उमटतें तीं चटदिशी सुधरतील असें समजावें पण जीं नुसतीं तटस्थ राहतात त्यांची सुधारण्याची आशा बिलकुल नको. मनुष्याचा चेहरा एकदम फिक्का पडणें हें विनय, प्रीति यांचेंही लक्षण आहे.

## सत्समागम

( आमच्या एका पूज्य मित्राकडून )

प्रख्यात थिआसोफिस्ट आनी बिझांट यांचें व्याख्यान ऐकण्याचा अपूर्व प्रसंग साधण्याकरितां काल रोजीं मुद्दाम उमरावती येथें जाऊन आलों. हा अपूर्व योग टाळून दुसरा साधूं ह्मटलें तर कलकत्ता, रंगून न्यूयार्क अगर फिलाडेल्फिया इकडे धांव मारावी लागली असती. या आपल्या प्रांतांतील बऱ्याच प्रसिद्ध ठिकाणांहून लोक तेथें आलेले मला भेटले. वर्धा, नागपूर, येथूनही कांहीं आले होते. "इंद्रभुवन" नाटकगृह चांगलें सुशोभित केलें होतें. स्वागतार्थ सूचक कमानी, व निशाणें लाविलीं होतीं. श्रोतृसमाज जवळ जवळ एक हजार असावा असें वाटतें. सायंकाळचे बरोबर ६॥ वाजतां बिझांटबाई सभास्थानीं दाखल झाल्या. त्या येताच लोकांनीं आनंद प्रदर्शित टाळ्यांचा गजर केला. व्याख्यान इंग्लिश भाषेंत झालें. साधारणपणें सूज्ञ व समजूतदार लोकां शिवाय इतर लोकांनीं येऊन गर्दी करूं नये ह्मणून पास काढिले होते. मला वाटतें, ही योजना ठीक झाली, कां कीं तीमुळें पुष्कळ त्रास वांचला.

व्याख्यान सुरू होण्या पूर्वीं मंडळीनें स्वागतार्थ कांहीं पद्यें संगीतांत ह्मटलीं. विद्वद्वर्य खापरडे साहेब यांनीं पूर्वसूचने दाखल थोडक्यांत सुरस भाषण केलें. नंतर लागलेंच व्याख्यान सुरू झालें. तें सव्वातास पावेतों अस्खलितपणें चाललें होतें. समाजांत तिलप्राय गडबड न होता, एकाग्रचित्तानें श्रोतृजन भाषण ऐकत होते ह्मणजे समाज चित्रासारखा तटस्थ राहिला होता. मधून मधून आनंदाने टाळ्यांचा गजर होत होता. व समाप्तीचे वेळीं टाळ्यांचा फार मोठा गजर झाला. साधारणपणें निरनिराळ्या धर्मांची माहिती हा व्याख्यानाचा विषय होता. बिझांत बाईचा आवाज मधुर, उच्चार स्पष्ट, भाषण सर्वांस ऐकूं जाईल अशा पद्धतीचें व स्थीरतेचें, आणि शद्बावर जेथल्या तेथें आघात देणें आणि योग्यस्थानीं विराम घेणें इत्यादि प्रकारांनीं युक्त असल्यामुळें व्याख्यान लोकांस आवडलें यांत नवल नाहीं. शिवाय प्रतिपाद्य विषयाची जुळणी, आणि सर्व दर्ज्याचे लोकांस सम्मत होणारे सिद्धांत यांचेंच उद्घाटन केल्यामुळें, भाषणाचा अनुकूल ठसा समाजाचे मनावर अर्थांतच उमटला व त्यांची चित्तवृत्ति सानंद झाली.

भाषणांतील आशय असा होता कीं, धर्मसंस्थापक ह्मणून जे कोणी होते, ते सत्यप्रिय, दूरदर्शी, मानवजातीचे हितचिंतक असेच असून त्यांनीं आपल्या ग्रंथांत सत्याचेंच निरूपण केलें आहे. तुह्मी हिंदुधर्माचें उदाहरण घ्या, ख्रिस्ती किंवा इस्लाम यांचें धर्मशास्त्र त्याचें मूळांत सर्व सत्यच आहे असें आढळून येईल. हीच गोष्ट बौद्ध धर्म व पारशी वगैरे अन्य धर्मी लोकांत ही ही लागते. मूळांत असें सत्य भरलें असतां धर्माच्या स्वरूपांत पुढें पुढें बद्दल होत जाऊन त्याचें मूळचें स्वरूप ओळखूं येण्यास कठीण असें होत गेलें. क्राइस्ट, महंमद, बुध, मनु, जॉरोस्टर प्रभृति निरनिराळे महात्मे, भिन्न काळीं व स्थळीं जरी उदयास आले तरी सत्यविषयक सिद्धांतांत त्यांची एकवाक्यता आहे. असें आहे तर मुसलमान व हिंदु, हिंदू व ख्रिस्तियन अथवा बौद्ध आणि इस्लाम धर्मी, सारांश कोण त्याहि विधर्मी लोकांनीं परस्परांशीं वैरभावाचें, धर्मसंबंधीं वर्तन ठेवावें हें रास्त नाहीं. पण तसें ते ठेवितात याचें कारण हेंच कीं आपल्या धर्मांत काय सांगितलें आहे हें शोधक बुद्धीने कोणी पहात नाहींत. सर्व धर्मांत, अज्ञानामुळें, व स्वार्थामुळें, मूळचीं स्वरूपें विकृति पावलीं आहेत. तीं अर्थांतच परस्पर विसदृश आहेत आणि ह्मणून कलहाचीं उत्तेजक आहेत. हिंदूस किंवा मुसलमानास धर्मांतर करण्याचें प्रयोजन नाहीं, व कोणत्याहि मनुष्यास अन्य धर्मावलंबन करण्याचें कारण संभवत नाहीं. हिंदू, इस्लामी, ख्रिस्ती, बौद्ध धर्मी, यांनीं आपापल्या धर्मांत निमग्न राहावें, पण हें राहणें. अज्ञानी अवस्थेंत, मात्र असतां नये. आपआपल्या धर्मप्रस्थापकांचे मताची पूर्ण ओळख करून घ्यावी ह्मणजे कलहाचें बीजच नाहींसें होईल. हल्लीं भांडणें आहेत त्यांच्या मूळास धर्मांचीं विकृत रूपें बहुधां धरून बसलीं आहेत. माणसांनें अज्ञानांत लोळावें या गोष्टीचा बिझांट बाईस मनापासून कंटाळा आहे आणि त्याची यांस फार दया येते.

विद्यमान काळच्या भिन्न मताभिमान्यांचीवर लिहिल्या प्रमाणें सम्म शोधनाविषयीं प्रवृत्ती होईल तर सत्याचीच त्यास प्राप्ती होईल. आणि ह्या भरत वर्षांत, हिंदू मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, जैन वगैरे विधर्म्यांचा धर्मसंबंधीं एकोपा होऊन ते बंधुत्वाच्या नात्यानें वागतील. व धर्मसंबंधीं त्यांचें हें एकच राष्ट्र होईल. व याच प्रमाणें सृष्टींतील मनुष्यजातींत धर्मसंबंधीं ऐक्य होऊन, एकाच देवाचीं हीं सर्व लेकरें आहेत या प्रेमभावानें तीं वागतील– आणि तो देव, सर्वज्ञ, अतिशय दयाळू, व प्रीति करणारा, असा सर्वांचा एकच आहे. त्याचे सान्निध जाणें, त्याची सेवा करणें, हा सर्वांचा एकच हेतु आहे. तो साध्य करण्याचे भिन्न मार्ग असले ह्मणून काय झालें ? भागीरथीचें जल, मृत्तिकेच्या घटांत किंवा सुवर्णाचे पात्रांत ठेविलें तरी एकच. अथवा हिंदूनें तें आपल्या लोट्यांत भरिलें, मुसलमान किंवा ख्रिस्ती यांनीं कांच पात्रांत, व पारशानें "जग" नामक पात्रांत भरिलें तरी तें भागीरथीचेंच जल असें ह्मटलें जाईल.

हें भाषण मोठ्या कळकळीचें, व प्रेमभावानें भरलेलें असें होतें. ईश्वरभक्त आनी बिझांट यांचे विषयीं, ऐकीव माहितीनें आदरबुद्धि मनांत उद्भवते ती पेक्षां प्रत्यक्ष अनुभवानें अधिक उद्भवते यांत संदेह नाहीं.

यांची मुद्रा गंभीर, हृदयस्थ–ज्ञानतेजानें तेजस्वी, व प्रसन्न अशी दिसते. राजटी व अडाणी लोकांची धार्मिक स्थिति खेरीज करून दुसरे धर्म यांस सम्मत आहेत. तरी त्या त्या धर्मानुयायांनीं अज्ञानी राहूं नये, धर्मग्रंथांचें पुरतें शोधन करून सम्म संपादावें असें यांचें आग्रहाचें व कळकळीचें सांगणें आहे.

ता० १।३।१९०१ एक प्रेक्षक

## वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध १४ शके १८२२

## खानेसुमारी

दर दहावे वर्षीं खानेसुमारी करावी असा इंग्रजी राज्यकर्त्यांनीं नियम घालून ठेविलेला आहे. त्या प्रमाणें ही चवथी खानेसुमारी होय. १८७१ पूर्वीं खानेसुमारी करण्यांत आल्या विषयीं ऐकिवांत नाहीं. आज दुनियेदारीला लागलेल्या पिढीला गेल्या तिन्हीं खानेसुमारींची व्यवस्था चांगली माहित झाली आणि आतां तर अनुभवानें हें काम अगदीं यंत्राच्या कामगिरीप्रमाणें बिनचूक होऊन लागलें आहे. १९०१ सालची दशवार्षिकी लोकसंख्या गेल्या शुक्रवारीं झाली आणि पुष्कळ महिन्या पासून जी गोष्ट गाजत होती ती त्या दिवशी रात्रीं ७ वाजल्या पासून मध्यरात्रीं पर्यंत निर्विघ्नपणें संपूर्ण पार पडली खानेसुमारीची मोठी गर्दी व गोंधळ पडत असे पण हें काम यंदा अगदीं सावधानपणें व स्वस्थपणानें उरकलें. इंडिया सारख्या अफाट राज्यांत खानेसुमारीचें कार्य कांहीं सामान्य नव्हे पण राज्यकारभारांतल्या निर्बंधांनीं व नियमांनीं तें काम अगदीं उत्कृष्ट रितीनें होत असतें. व खऱ्या श्रमविभागाचें तत्व खानेसुमारीच्या दृष्टान्तानें उत्तम कळून येतें. गेल्या शुक्रवारीं केलेल्या खानेसुमारीच्या आंकड्यांची एकुणात लवकरच प्रसिद्ध होईल तेव्हां लोकसंख्येचे आकड्यावरून महत्वाच्या पुष्कळशा अनुमानांचा उलगडा होईल. खानेसुमारीचा फायदा राज्यकर्त्यांना जसा आहे तसा प्रजेलाही आहे. गेलीं दहा वर्षे कशीं गेलीं याचा ठोकळ ताळा खानेसुमारीच्या आंकड्यावरून पाहतां येतो. पूर्वींच्या दोन्ही खानेसुमारीच्या वीस वर्षांत मोठेसे अनर्थ गुदरले नव्हते पण यंदाच्या खानेसुमारीच्या गेल्या दहा वर्षांत दुष्काळ, प्लेग, पटकी वगैरे उपाधींनीं मोठाच संहार केलेला आहे. इंग्रजी राज्यांत स्वस्थता व शांतता अतीच पराकाष्ठेची आहे. किंबहुना या सुखासमाधानीच्या व चैनबाजीच्या राज्यांत धंदे हुन्नर कलाहीं बुडत चाललीं, सर्व लोकांच्या चरितार्थाची भिस्त काय ती एकट्या शेतीवर येऊन पडली आणि परराष्ट्रीय ऐषआरामाच्या व मौजेच्या पदार्थ संग्रहाची अवीट गोडी लागत चालली. या दिनचर्येच्या सौख्यामुळें व निरुद्योगीपणामुळें प्रजावृद्धी फार जोरानें वाढत गेली तर कांहीं नवल नाहीं. राष्ट्रीय आपत्ति ह्मणून जेव्हां प्राप्त होतात तेव्हां प्रजावृद्धीच्या कार्याला खळ पडत असतो पण या सुखसंपन्न राज्यामध्यें उपभोगाच्या गोष्टी फार सुबत्त्या आणि प्रजावृद्धीकडेच सर्व लोकसमूहाच्या शक्तिसंचाचा व्यय निर्वेधपणें होऊं लागला. इंडियन संपत्तीला विलायतची जी ओढ लागली आहे तिनें देश दरिद्री होत चालला, व प्रजावृद्धि ह्मपाट्यानें वाढून परिणामीं तरुण प्रजा अल्पायुषी, निःसत्व, व कार्योद्यमाला असमर्थ अशी होत चालली आहे. शेवटच्या परिणामामुळें जननाची क्रिया व मरणाची क्रिया याची परिपाटी फार सत्वर व वेगाची होऊन देशाच्या ऱ्हासाला ज्या ज्या गोष्टी एकत्र व्हाव्या लागतात त्या आमच्या राष्ट्रामध्यें संकलित झाल्या आहेत. पंधरा वीस वर्षां पूर्वीं असा समज असे कीं खानेसुमारीच्या आंकड्यांनीं प्रजावृद्धी निदर्शित केली तर ती गोष्ट मोठी आनंदाची व जयजयकाराची मानीत. पण अर्थशास्त्राच्या इतर नियमा प्रमाणें प्रजावृद्धिचा हा नियमही कांहीं विवक्षित मर्यादेच्या आंतच खरा असतो. अर्थशास्त्राचे सिद्धान्त त्या त्या गोष्टींची एक एक गती दर्शवितात पण भिन्न भिन्न परिस्थितींत त्या सिद्धान्ताचें पूर्व स्वरूप अगदीं बदलतें आणि परस्पर विरोधी कारणसमुच्चयानें एका सिद्धान्ताच्या उलट परिणाम दिसून येतो. हीच गोष्ट खानेसुमारी विषयीं लिहितांना प्रत्यन्तराला येते. प्रजावृद्धीची गोष्ट इंडियाला अभिनंदनीय पूर्वीं असेल पण निदान आजच्या प्रजेला ती मोठी बाधक आहे. दुष्काळ, प्लेग, व इतर रोग या प्रतिरोधक गोष्टींना न जुमानता जर लोकसंख्येची बाढच दिसून येईल तर आमच्या लोकांच्या कामोत्सुकपणाचें प्रदर्शनच होईल ! या प्रदर्शनाला आह्मी भितों असें नाहीं कारण ती वस्तुस्थिती आहे; ती बदलणें आमच्या अटोक्याचे बाहेर परंतु या दुःखप्रसवाच्या कारणांचा परिहार सरकारच्या मात्र हातीं आहे. देशाची सांपत्तिक स्थिती सुधारण्याला सरकारनें विन्मुख न होतां सन्मुख झालें पाहिजे आणि मग अर्थातच लोक उद्यमादि कार्यक्रमाला लागतील आणि भावी पिढ्यांचा भाग्योदय चांगला होईल.

## औद्योगिक शिक्षण

मनुष्याला आपला प्रतिपाद्य विषय मोठा प्रिय असतो आणि तो त्याच्या समर्थनासाठीं आपल्या विषयाचें महत्व सांगत असतो. अशा विवादांत जर एखाद्या संग्राह्य विषयाचा आधिक्षेप करावयाचा असेल तर तो त्याला मोठ्या चतुराईनें करावा लागतो. ही प्रतिपादनाची चतुरस्रता लार्ड कर्झन साहेबांच्या भाषणांत मोठी प्रेक्षणीय आहे व्हिक्टोरिया स्मारका विषयीं ते फार आतुर आहेत आणि त्यांच्या मनानें व्हिक्टोरिआ अनवस्थान. बांधण्याची गोष्ट पक्की घेतली आहे. त्यांच्या सारख्या उत्कृष्ठ वक्त्यानें आपले सर्व विचार त्या गोष्टीच्या विवेचनांत अर्पण केले आणि त्या विवेचनाला श्रेष्ठ अधिकार व मोठी राजसत्ता यांनीं शोभा आणिली म्हणजे कोणता विषय सुंदर व रमणीय वाटणार नाहीं! गेल्या मंगळवारीं आशिआटिक आसोशिएशनच्या सभेपुढें हाच विषय लार्ड कर्झन यांनीं मांडला होता आणि तो मांडतांना विरोधी पक्षाच्या अभिप्रायांचे खंडन करणें त्यांस भाग वाटलें. हल्लीं महाराणी व्हिक्टोरिआंच्या स्मारकासाठीं म्हणून औद्योगिक शिक्षणाच्या शाला काढाव्या असा सर्व लोकांचा पक्का निग्रह आहे आणि तो निग्रह बदलल्या शिवाय आपली वर्गणी जमविण्याचा कार्यभाग चांगला साधणार नाहीं हें लार्ड कर्झन ओळखून आहेत. स्मारकाच्या संस्था औद्योगिक असाव्या अशा विषयीं मुंबई व मद्रास येथील बहुसमाजानें आपापले संकल्पही केले आहेत. चांगल्या निर्णित झालेल्या गोष्टीला प्रतिरोधही करितां येत नाहीं आणि आपल्या इष्ट स्मारकाला तिची आडकाठीही होतां कामा नये अशा दुहेरी धोरणावर लार्ड कर्झन साहेबांनीं मोठ्या युक्तिवादानें औद्योगिक संस्थेचा प्रश्न बाजूला सारला आहे. या प्रयत्नांत त्यांनीं सभ्याची कास सोडली नाहीं म्हणून त्यांचें अभिनंदन करितों आणि औद्योगिक संस्था फारच फार चांगली आहे व ती स्थापण्याची जबाबदारी सरकारची आहे इतक्या नुसत्या गोड गोड बोलावर या प्रश्नाचा निर्मोक्ष कायमचा होऊं नये अशी आह्मी लार्ड कर्झन साहेबांस विनंती करितों.

लार्ड कर्झन या स्मारकाच्या गोष्टी विषयीं बोलतांना औद्योगिक शिक्षण संबंधानें ह्मणाले कीं:—

औद्योगिक शिक्षणाचा हेतु इतका उत्कृष्ठ आहे कीं मला त्या विरुद्ध एक ब्र सुद्धां काढितां येत नाहीं. इंडियांत औद्योगिक शिक्षणाची भावी कालाला पुष्कळ तऱ्हेनें आत्यंतिक गरज आहे; आणि तत्संबंधी या समयीं इतकेंच ह्मणतों. स्मारकाचा फंड केवढाही गोळा झाला तरी त्यावरील व्याजाच्या रक्कमेनें अल्पसें शिक्षण देण्याचा खर्च भागेल आणि इंडियाच्या तरुण पिढी पैकीं आणुरेणू इतक्या अगदीं थोड्या विद्यार्थ्यांस तरी दर वर्षीं त्या शिक्षणाचा लाभ होईल किंवा नाहीं या विषयीं संदेह आहे. कोणत्या तत्वावर विद्यार्थ्यांस औद्योगिक विद्या शिकवाव्या हें अजून निश्चित नाहीं; आणि त्या विद्या शिकल्या नंतर त्यांच्या ग्रहणशक्ती प्रमाणें व विद्येतील पारंगतते प्रमाणें त्यांच्या धंद्यांची तरी सोय हल्लीं झालेली नाहीं, या बाबदींत गेलीं १९ वर्षें इंग्लंडांत भवति नभवति चालूं आहे पण कायमची अशी एकही निर्णित झालेली नाहीं. महाराणी व्हिक्टोरिया सरकारच्या चरित्रांत औद्योगिक संस्थेचा प्रत्यक्ष असा संबध कोठेंच येत नाहीं तेव्हां त्यांच्या स्मारकाचा या असंबद्ध कार्याशीं संबध जुळविण्याची गोष्ट मला अगदीं युक्त दिसत नाहीं; औद्योगिक विद्यादान जनसमूहा पैकीं विविक्षित भागाला द्यावयाचें आहे आणि तें सरकारचें व समाजाचें संयुक्त कर्तव्य आहे.

वरील उद्गार फार चिरस्मरणीय आहेत आणि आह्मी इतकेंच विचारतों कीं गेलीं ७९ वर्षें राज्य करूनही सरकार आपलें कर्तव्य केवळ कागदीं ठेऊन न करण्याइतकें अवघड आहे आणि ह्मणून त्याज्य आहे कीं काय? लार्ड कर्झन साहेबांच्या भाषणाचा ओघ तर सर्व असाच दिसतो.

---

### OURSELVES

Our subscribers will, we hope, allow us the usual Holika holidays which they have hitherto done ungrudgingly As our offices will be closed for these days no paper will be issued on the 11th instant.

---

## The Berar Samachar

MONDAY MARCH
4 1901

---

There is a new political race in India. This racial feeling is due to the exigencies of the modern life The old differences of race, creed and religion are fast dying out. The unifying sentiment is the citizenship of the British empire. It has killed our different nationalities and welded all people into one nationality. There is a broad feeling of brotherhood; but this community of interests is rather limited in its sphere. Against all foes, we stand shoulder to shoulder along with the English people. To the world at large the British and the Indian people form one people - and it is very difficult to break up this unity and to remove the common platform upon which we stand along with the English people to the admiration of the outside world.

But it is no good to conceal the feeling of estrangement. When we begin to weigh matters as between the Indians and the English people we make a distinguishing mark. The line of diflerence that we chalk out is based on the rights of the conquerring race over those whom they have conquerred. The political diplomacy begins here and there runs a marked line between the rights of an Englishman and those of an Indian. We act like strangers and play our part as one stranger gaining the best victories over the other. The interests of the ruling people are different from those of the subject-races. There is no longer any common partnership between the two sects into which politics have divided the citizens of the British empire. No homogeneous sentiments and harmonies are lost between the two peoples and this racial feeling based on the British politics will explain in a large measure the prosperity or otherwise of the two nations which form one solidified British empire. We do not mean that the conquerors should not have a larger share as a reward of their victories but there should be a common feeling amongst the members of one firm though their respective shares may vary in their magnitudes. There is no denying the fact that the stronger must have the lion's share. As long as might is right we bow down to this principle which the history of the world has established. It is axiomatic that the lion claims and takes a greater share in the division of interests. But we wish to make a difference in the two sets of facts viz when the lion claims a arger share and when the lion claims the whole as his share. The first is an enviable stage of civilization. And the latter shows that it is suicidal and destructive. In the latter case it is a war between a dwarf and a giant. The weaker of the two succumbs in the course of nature and we are afraid that, in the present race, we are like dwarfs fighting against the ruling giants. The ruin of our people as a nation is a foregone conclusion unless there comes on a change in the policy of the government. England professes to rule over India for her own advancement; But there is no self—denial on the part of our rulers in sacrificing their own interests for the advancement of the Indian people. There is no longer the emulation which brings the two rivals to strive for higher enmience. We are no doubt the vanquished in the field but we should have been admitted to the proud privilegs of a British citizen. We do not form the living members of the British corporation. The history of the last century explains at one stroke why England grows richer whereas India poorer. Whatever augments the resources of one minimizes the springs of the material wealth of the other. In Indfa we illustrate the stages of a dying nation and in England we find the vitality of a living nation. It is not that the Indians or the Englishmen will not compare well together in point of ability, power of intelleet, and the discharge of duty. We are like spendthrifts who run through their large fortunes and the Englishmen are the misers who watch all opportunities of advantage. Both these people are reaping the fruits of their past sowing We are not going to find fault with our rulers. By our contact with them we have grown wiser with sad experiences and hope to rise again to the level of our old compeers the English people. But this task is Herculean, We know well the dignity of labour—and understand full well the principle of self-help. But with our self—help we want the divine help of our rulers. They should try to raise us to their level of material prosperity and we hope to be as independant in tone, as flourishing in life and as noble as our rulers themselves. We have got every thing in India on the English model but we have got nothing that builds a nation's prosperity in the advances of scientific knowledge, mechanical inventions, bold enterprises and adaptability to circumstances. In short we want the development of technical education as the key—stone of the future fabric of India.

## वऱ्हाड

हवामान— गेल्या शुक्रवारीं आकोल्यास गारांची वृष्टी झाली; आणि हा पाऊस बऱ्यास ठिकाणीं झाल्या विषयीं कळतें. हवा सर्द आहे व गारठाही थोडासा आला आहे. हा अवकाळींचा पाऊस लोकांच्या शरीरप्रकृतीला मोठीच बाधा करीत आहे.

मे० रुस्तुमजी फर्दूनजी डेपुटी कमिशनर आकोला हे पुढील महिन्या पासून तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जाणार आहेत. आणि तसेंच रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर ए० असि० कमिशनर हेही तीन महिन्यांच्या रजेवर जाऊं इच्छितात.

रा. रा. देवराव जयकृष्ण देशपांडे ए० असि० कमिशनर तेल्हारा हे पुढील महिन्यापासून पेनशन घेणार आहेत.

रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल, एल. बी. ए० असि० कमिशनर मोर्शी यांस असिस्टंट सेन्सस सुपरिन्टेंडंट नेमण्यांत आलें आहे.

आलिशान नामदार लेफटेनंट कर्नेल डी. डब्यू. के. बार, सी. एस. आय. पोलिटिकल रेसिडेंट वर्ग १ ला यांस हैदराबादच्या रेसिडेंटीच्या जागीं तारीख १ सप्टेंबर १९०० पासून कायम करण्यांत आलें. या नामदार साहेबांची कारकीर्द लोकांस मोठी लाभकारक व शांतिप्रद वाटत आहे.

सुटी— हुताशनीच्या व रंगपंचमीच्या सणामुळें सालाबादच्या मामुल वहिवाटी प्रमाणें पुढील सोमवारचा ह्मणजे तारीख ११ मार्च १९०१ चा अंक काढण्यांत येणार नाहीं.

अमदाबादचे प्रसिद्ध गृहस्थ रा. रा. गणेश गोपाळ पंडित यांनीं काल सायंकाळीं येथील लायब्ररींत 'वर्णाश्रमस्थिती' या विषयावर सुरस व्याख्यान दिलें. अध्यक्षस्थानीं रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. हे विराजमान होते.

आभारपूर्वक स्वीकार:—

( १ ) दी एम्पायर आफ इंडिया लाइफ आसुअरन्स कंपनीचे एजंट मि. आर. इ. भरुचा यांनीं दिलेलें क्यालेंडर व कंपनीचे प्रास्पेक्टस

( २ ) महमद पैगंबर—ग्रंथकर्ते रा. रा. गोविंद नारायण काणे यांजकडून

( ३ ) शके १८२३ चे संचालित पचांग—रा० रा० मोदवृत्त कर्त्यांकडून, हें पंचाग उत्कृष्ट असून संग्राह्य आहे,

वऱ्हाड—हायस्कूल—माजी—विद्यार्थी समाजाच्या बैठकीला आज यवतमाळास प्रारंभ होऊन उद्यां समाप्त होईल. यवतमाळच्या गृहस्थांनीं फार उत्कृष्ट तयारी केली असून मंडळीच्या सोयी कडे विशेष लक्ष पुरविलें आहे.

---

## वर्तमानसार

कोलोम्बो येथें चहाची लागवड मोठी आहे. तिकडून येणाऱ्या चहावर जी जकात बसविली ती वाढविण्यांत आली तर चहाच्या व्यापाराला मोठा धोका पोचेल अशा विषयीं सिलोनच्या सरकारानें स्टेट सेक्रेटरीला विनंती केली आहे. जो तो आपापल्या व्यापाराला जपतो ह्मणून इंडियाच्या व्यापाराला जपण्याची गरजच नाहीं असें दिसतें.

बादशहा एडवर्ड हे जर्मनीला गेल्या बुधवारीं पोंचले. क्रानबर्ग येथें ते जर्मन बादशहा वुलियम यांच्या बरोबर आपल्या बहिणीच्या भेटीला गेले. या बाई हृद्रोगानें ग्रस्त आहेत तथापि त्यांच्या आयुर्मर्यादेचा शेवट आणखी कांहीं महिने पर्यंत येणार नाहीं असें डाक्टर ह्मणतात.

**लोकसंख्या.**–जर्मनीची लोकसंख्या ५,६३,४५,०१४ असून गेल्या पांच वर्षांत ४० लक्ष लोकसंख्या वाढली असा हिशोब निघतो.

**रणशूर.**– डीवेट व बोथा हे मोठ रणशूर आहेत. इंग्रजी सैन्याच्या समुद्रामध्यें ते आपल्या छोट्या सैन्यानिशी खेळ खेळत आहेत आणि अजून इंग्रजी सैन्याच्या अफाट विस्ताराला भिऊन जर्जर होत नाहींत हें नवल होय.

लढाईचा प्रवेश सोमाली बेटांत चांगला झाला आहे. इंग्रजी ५०० लोकांच्या टोळीवर शत्रू तुटून पडले तेव्हां कर्नल मेटलांड हे मृत झाले हें वाईट वर्तमान होय.

**गांजा व उंदीर.**– उंदिराला गांजा फार भक्तीनें आवडतो असें दिसतें. आकोले येथें सरकारी चिरेबंदी कोठडींत जो गांजाचा खजिना आहे तेथें हरप्रयत्नानें उंदीर आपला मार्ग काढतात, गांजाचें सेवन झाल्यानंतर उंदीर इतके तृषित व व्याकूळ होतात कीं आसपासच्या दौतींतली ते शाई पितात. आणि पाणी मिळावें ह्मणून जीवापाड धडपड करितात. उंदिरांस पकडण्याला गांजाचा उपयोग चांगला होईल असा तर्क आहे.

**व्हिक्टोरिआ--मंदीर**— व्हिक्टोरिआ स्मारकाचा अजबखाना करण्या संबंधानें लार्ड कर्झन यांनीं आपले विचार गेल्या मंगळवारीं प्रगट केले. त्यांचा मनोदय असा आहे कीं सर्व राष्ट्रांचें ह्मणून एक टोलेजंग व अश्रुतपूर्व व्हिक्टोरिआ मंदीर झालेंच पाहिजे आणि त्यांत चिरस्मरणीय इतिहासाच्या गोष्टींची आठवण देणाऱ्या वस्तु संग्रहित कराव्या. लार्ड कर्झन याचे विचार वर्गणी मोठीच जमली तर शिल्लक फंडाचा व्यय दुष्काळ फंडाकडे करण्याचा आहे.

**दुर्भाग्य**--पार्लमेंटच्या सुरवातीला महाराज चक्रवर्ती एडवर्ड यांचें जें संभाषण झालें त्या भाषणाला उपसूचना ह्मणून नामदार केन यांनीं सूचविलें कीं वेल्बी कमिशनच्या शिफारशी प्रमाणें जो खर्चाचा भाग इंडियाच्या खर्चांतून पुढें कमी करण्याचा निश्चय सरकारनें केला तोच खर्च गेल्या वीस वर्षांतला एकत्र करून त्याची एकूण रकम दुष्काळ–फंडाच्या रूपानें इंडियाला परत देण्यात यावी. ही सूचना अमान्य ठरली व ती ठरावयाचीच !

पृथ्वीची घडामोड— कित्येक विद्वानांनीं असा हिशोब बसविला आहे कीं पृथ्वीवर जनन मरणाची होणारी घडामोडीचे आंकडे अंदाजानें येणें प्रमाणें आहेत.

| | जनन | मरण. |
|---|---|---|
| दर मिनिटीस | ७० | ६७. |
| दर दिवसास | १००००० | ९७७९० |
| दर वर्षी | ३,६७,९२,०००, | ३५६३९८३५ |

निष्कांचन इंडियांत ३५ हजार पौंड किंमतीच्या सोन्याच्या चिपा आस्ट्रेलियांतून येत आहेत. काळ फिरला ह्मणजे देशावरचें मीठ कोकणांत नेऊन विकावें लागतें. सोन्याचा धूर इतिहासाच्या ग्रंथांतच राहिला !

**दुर्भाषण**— बंगाल्यांतील बेगुसराई येथील न्यायाधीश मि. गाब्रिअल यांनीं बाबू पशुपती चतर्जी वकील यांस एका खटल्यांत दूषण लावून उद्गार काढला कीं भंग्याला देखील अशी गोष्ट शोभणार नाहीं. सर्व वकिलांनीं हें कोर्ट सोडून दिलें आणि मि. गाब्रिअल यानवर बेअब्रूचा खटला करण्याविषयीं सरकारची परवानगी मागण्यांत आली आहे. इतर न्यायाधीशांनीं दुर्वचनानें तोंड अपवित्र न करण्यास शिकावें.

**नेत्ररोग** —अलिकडच्या तरुण मंडळीला नेत्राची कांहीं ना कांहीं तरी व्यथा असतेच. कोणाची दृष्टी लांबवर पोंचत नाहीं, कोणाचे डोळे दुखरे व तेजहीन असतात, कोणाला आरशी लावल्या शिवाय जवळचा पदार्थ दिसत नाहीं; अशा नानाविध तक्रारी ऐकूं येतात नेत्राला रोग जडण्याला कारणें अनेक असतील त्यामध्यें नवीन मंडळी कमताकद असल्यामुळें आणि त्यांस विद्येसाठीं बारीक टाईपाचीं पुस्तकें वाचावीं लागल्यामुळे दृष्टी पुष्कळवेळां बिघडते असा अनुभव आहे. जपानामध्यें असा कायदा आहे कीं पुस्तकें लहान टाईपांत छापूं नयेत. त्याच प्रमाणें इंडियांतही मोठ्या टाईपांनीं छापण्याचा कायदा निघेल तर लोकांवर मोठा उपकार होईल. छापखानेवाले प्रथम ओरडतील पण शेवटीं ही योजना मोठी सुखावह होईल.

सर्कीचें टर्फल काढून आतल्या मगजाचें तेल काढितात व टर्फलांचा उपयोग इतके दिवस जाळण्याकडे करीत असत. पण ह्या टर्फलाचे कागद करण्याची सुगम युक्ति एकानें काढली आहे. आपलेकडे कागद करण्याच्या द्रव्याची दुर्मिळता होत चालली, आणि त्यामुळें कागद करण्याचा 'पल्प' महाग झाला होता. लांकूड वगैरे द्रव्यांचा पल्प कांहीं बराच वेळ तसाच राहिला असतां त्याचा रंग पिवळट होतो, पण सर्कीच्या टर्फलाचा पल्प कितीही वेळ राहिला तरी त्याचा रंग पांढराच राहतो. शिवाय सर्कीच्या टर्फलाच्या एक टण पल्पास अवघा पांच पौंड खर्च येतो. आणि लांकूड वगैरे इतर द्रव्याच्या पल्पास ह्याच्या तिप्पट खर्च येतो. शु० सू०

पांचशें मनुष्यें भाजून मेलीं—बेकू येथील पेट्रोलियम खाणींत गेल्या आठवड्यांत आग लागून त्या योगानें तेथें ५०० मनुष्यें भाजून मेलीं असें समजतें.

दोनशें फूट उंच उडणारा तेलाचा झरा अमरिकेच्या टेक्सस प्रदेशीं दोनशें फूट उंच उडणारा सहा इंच व्यासाचा रॉक आईलचा मोठा झरा लागला आहे. त्यापासून रोज २५००० पिंपें तेल निघत आहे ह्मणून तेथील लोकांना मोठा आनंद झाला आहे.

## नोटीस

धनसिंग वल्लद सखाराम घडेकार राहणार लेहगांव तालुका दर्यापूर जिल्हा इलिचपूर. यांस.

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते तुझ्याबरोबर माझें लग्न लहानपणींच झालें. पुढें तुह्मी कोठें गेला त्याचा पत्ता नाहीं. तुह्मी परांगदा झाल्याला आज कमीत कमी ९।१० वर्षे होऊन गेली. मी तुमचा पुष्कळ प्रकारें शोध केला. कोणी कांहींच तुमच्या संबंधाची बातमी देत नाहीं. तुमच्या कुळांतल्या कोणाही माणसास तुमच्याबद्दल माहिती लागत नाहीं. मी गावोगांव हिंडले पण सर्व श्रम व्यर्थ झाले. माझ्या आप्तानींही हजारो प्रकारचा तपास केला पण कांहींच ठाव ठिकाणा लागला नाहीं. आतां माझा जन्म व्यर्थ झाला आहे. गेल्या दोन दुष्काळांत मी मोठ्या कष्टानें दिवस काढले. तुमच्या घरचीही कांहीं जिनगी नाहीं, ह्मणून मला कोणत्याच प्रकारें आश्रय नाहीं. तुमची गणना मृतांमध्ये लोक करितात परंतु मी पुन्हा एकवेळ ही जाहिर-नोटीस तुह्माला दिली आहे. तुह्मा बरोबर मी राहण्यास तयार आहे पण या नोटिशीच्या तारखे पासून एक पंधरवाड्या आंत तुह्मी आपला मागमूस कांहींच दिला नाहीं तर मी कायदेशीर रितीनें दुसरा घरठाव करीन मग माझ्यावर तुमचा लग्न संबंधाचा हक्क राहणार नाहीं. कळावें तारीख २६।२। १९०१ इसवी.

सही

सोनी मर्द धनसिंग घडेकार
राहणार लोहगड परगणे
बारशीटाकळी तालुका आकोला इच्या
हातची निशाणी
बांगडी

## जाहिर खबर.

( बक्षीस ५ रुपये )

धनसिंग वल्लद सखाराम घडेकार राहणार लोहगांव तालुका दर्यापूर जिल्हा इलिचपूर हा माझा नवरा असून परांगदा झाला आहे. त्याचा गेल्या ९।१० वर्षा पासून कोणास कांहींच पत्ता नाहीं. जर कोणी त्याच्या वस्तीची व त्याची माहिती संपूर्ण मला कोणी एक महिन्याच्या आंत देईल तर मीं त्याला पांच रुपये बक्षीस देईन कळावें तारीख २६ माहे फेब्रवारि सन १९०१ इसवी.

सही

सोनी मर्द धनसिंग घडेकार
राहणार लोहगड परगणे
बारशीटाकळी तालुका
आकोला इच्या
हातची निशाणी
बांगडी.


## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एकहजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ॥।- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ८।२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळेल. शाई मागविणारांनी ट. ह. सह ८।४ ची मनिआडर पाठवावी. तांच त्याचे नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता-- एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा कर वसूल करण्याचा सन १९०१।१९०२ सालचे हक्कांचा लीलांव तारीख १८ मार्च सन १९०१ इसवी रोजीं सकाळीं ८ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहू वेळीं टौनहालांत हजर व्हावें. कळावें तारीख १६।२।१९०१ इसवी.

K. G. Damle
Secretary
A. M. C.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

| | | |
|---|---|---|
| वर्षाची आगाऊ | ९ | हाशाल ७१२ |
| सहामाही | " २ | " ८८ |
| साल अखेर | " ७ | " १ ८८ |
| किरकोळ अंकास | ........................८४ | |

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस........ ८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Annual in arrears ...
Six monthly......... 3 ............... 8
ingle copy ..................................4

Advertisement
Below 10 lines ...... 2
Per line over 10 ......4
Repetition Per line...3


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOLXXXV AKOLA MONDAY 18 MARCH 1901 NO 10

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख १८ माहे मार्च सन १९०१ इ० अंक १०


### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एकहजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १९ जुलै } A. G. Watson
१८९८ } Agent.


### जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ॥।- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ८।२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणारानीं ट. ह. सह ८।४ ची मनिआर्डर पांच. तांच त्याचे नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता--एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें


### नोटीस

रा. रा. भगवान वल्लद भिवसेन देशमुख रहाणार जानोरी तालुके खामगांव यांसः—

मी खालीं सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमच्याशी माझें लग्न होऊन सुमारें १०।१२ वर्षे झालीं. मी न्हातीधुती झाल्यावर सुमारें ७।८ महिने आपणापाशीं होते. पण आपला जनरीती प्रमाणें मजशी व्यवहार होईल अशा रितीनें तुह्मी वागला नाहीं ह्मणून मी पुढें आपल्या आईचे घरीं जाऊन राहिले त्यास आज सुमारें २-३ वर्षें झालीं. हीं वर्षें काळाचीं गेलीं व मला माझ्या चरितार्थाबद्दल दुसऱ्यावर अवलंबून रहावें लागलें. असो. मी आपल्या बरोबर नांदण्यास अगदीं तयार आहे पण माझी नांदणूक आपल्या बरोबर होण्याचा संभव नाहीं. माझा विचार आतां गंधर्व करण्याचा आहे. तर आपण ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत मला फारकती द्यावी व माझा इतके वर्षाचा पोटगीचा खर्च द्यावा. असें वरील मुदतींत न झाल्यास हीच नोटीस सोडचिठ्ठी समजून मी दुसरा घरठाव करीन. मग आपला नवरेपणाचा हक्क मजवर चालणार नाहीं. व पोटगीबद्दल योग्य तजवीज करीन. कळावें तारीख ७।३।१९०१ इसवी.

सही

(सहीची निशाणी बांगडी) जनी
मर्द भगवान देशमुख हल्लीं
वस्ती माहुली तालुके दर्या
पूर इचे हातची असे.

### वाशीम.

ता० १५।३।१९०१

हवामान—कधीं आकाश स्वच्छ --कधीं आभ्रें येतात--दिवसा उष्मा भासूं लागला. प्रातःकाळीं मात्र गुलाबी थंडी असते. रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं. गुरांस चारा व पाणी पुरेसें आहे. ज्वारी खेरीज करून इतर धान्यें व तूप वगैरे जिनसांचें भाव अतिशय वाढले आहेत.

खानेसुमारी—आमचे शहरची खानेसुमारी निर्विघ्नपणें शेवटास गेली. एन्यूमिरेटर्स लोकांपैकीं ज्या स्कूल्स मास्टर्सकडेस गणतीचीं कामें सोपविण्यांत आलीं होतीं त्यानीं फार उत्तम रितीनीं काळजीपूर्वक आपापलीं कामें बजाविलीं. व शाबासकी मिळविली. शिवाय सर्व सुपरवायझर आणि सुपरिन्टेंडेंट यानींही आपलीं कामें मेहनतीनें केलीं. वाशीम शहरची एकंदर लोकसंख्या १३००० भरली आणि मागील खानेसुमारीपेक्षां या खानेसुमारींत वाशीम जिल्ह्यांत ८२००० हजार लोक संख्या कमी झाली.

म्यु० इलेक्षन—मेसर्स कुंजीसा मावजीसा, गणपत सदाशिव आणि शिवनाथ शेट रिसोडकर या त्रिवर्ग मेंबरांची मुदत पुरी झाल्यामुळें म्यु० इलेक्षनची मिटिंग झाली. मि. शेख इस्माईल ए. अ. क. हे पोलिंग आफिसर होते. बहुमत्तांनीं सदरील तिन्ही गृहस्थ पुन्हा मेंबर निवडले गेले.

रा. रा. शेषराव रघुनाथ वकील वारल्या पासून म्यु. सेक्रेटरीची जागा रिकामी झालेली आहे. पहावें सेक्रेटरीचे जागीं कोणाची नेमणूक होते ?

नेमणूक—मि. हाल्डन डि० फॉ० आ० वाशीम यानीं तीन महिन्यांची रजा घेतली त्यांचे जागीं मि. किनी यांस नेमलें.

मि० जे आर. एडवर्डस ए. अ. क. यांची बदली औरंगाबादेस झाली. व मि० हैदरअलीखान यांस वाशिमास बदलले.

अपील नामंजूर—मि. माणकीकर यांस दुसेर मुकद्दम्यांत रा. रा. त्रिंबक गणेश परांजपे, मा० वर्ग १ जिल्हा वाशीम यांनीं इं. पी. कोड कलम ४०९ प्रमाणें दोन वर्षें सक्त कैद आणि दोनशें रुपये दंडाची शिक्षा दिली होती. त्यावर आरोपीनीं हायकोर्टांत अपील केलें होतें तें नामंजूर झालें.

रुजू झाले—मि. शेखइस्माईल ए. अ. क. हे एक आठवड्याचे रजेवर उमरावतीस आणि मि. जेम्स फेअर व्हेदर डि. सु. पो. हे एक महिन्याचे रजेवर पंजाब प्रांतीं गेले होते ते रजेवरून परत येऊन आपले कामावर रुजू झाले. व मि. रुईन हे आपले मूळचे असिस्टंट सु. पो. चे जागीं उमरावतीस परत गेले.

इन्स्पेक्शन— मि. ग्रांट सुपरिंटेन्डींग इंजिनियर आणि सर्जन कर्नल सी. एल. स्वेन सानेटरी कमिशनर मु. अ हैद्राबाद हे आफिसर येथें येऊन आपापले खात्याचे इन्स्पेक्शन करून दुसरीकडेस रवाना झाले.

फिरत आहेत— मि. हरिहर काशिनाथ पटेल, स्पांड ॲकाविझेशन आफिसर, हे सध्यां या जिल्ह्यांत आमच्यासहीत दवरा फिरत आहेत.

एक 'क्ष'

### इंगोली ता० १४।३।१९०१ इ०

दिनचर्या—प्रभातकाळीं कांहींशीं थंडी पडते. दिवसा गरमी होते—पुनः ढगें येऊं लागली. बेमारी वगैरे सध्या कांहीं नाहीं. धारण तेजीची असून पाण्याचा पुरवठा चांगला आहे.

खानेसुमारी— क्यान्टोन्मेंट आणि कसबे इंगोली ( मंगळवारा ) येथील खानेसुमारीचे काम योग्य रितीनें पुरें झालें. छावणीचे हद्दीतील बंदोबस्त मि. महंमद बिसमिल्लाखान कोतवाल आणि मोगलाईचे हद्दीतील सर्व व्यवस्था मि. जमशेदजी तहशिलदार यांजकडे सोपविण्यांत आली होती. उभयता अमलदारांनीं आपलें काम फार लक्ष लावून शेवटास नेलें.

सफाई—मंगळवारा येथील सफाई बरोबर राहात नसल्या कारणांनीं छावणीतील अधिकारी नाखूष असतात. जरी प्रस्तुतचे तहशिलदार साहेब हे सफाईकडेस बरेंच लक्ष पुरवीत असतात तरी जी मनीषा इंग्रेज अधिकाऱ्यांची आहे ती पुरी होत नाहीं. असे दुःखानें ह्मणणें भाग पडते.

पोबारा केला— मागील दुष्काळचे वेळीं कसबे नर्सी व बेलवाडी येथील अनाथ गृहांचे व्यवस्थापक मि. मल्ल्या यांचे दप्तरांत फार घोटाळा होऊन त्याचें संबंधानीं ऐकांत बरीच चर्चा झाली. हल्लीं स[...] गृहस्थांनीं मोगलाई अमलदारांस हिशेब देतां या जिल्ह्यांतून एकदम पोबारा केला.

नेमणूक—क्याप्टन जे. एम. उड. यां[...] स्टॉफ अफिसर केल्यामुळें सेकंड क्याव्हल[...] रीचें क्यापटन ए. आर. सांडर्स यांस बाजा[र] मास्तर व पोलिस सुप्रेन्टेन्डेंटचे कामा[स] नेमलें.

मौलवी सय्यद शाहा हाफिझ महंम[द] इस्माईल साहेब मुन्सिफ तालुके इंगोली यां[नीं] रजा घेतली असून त्यांचे जागीं मुन्शी महम[द] द यहयाहसन यांची नेमणूक झाली. [...] गृहस्थ मौलवी महंमद निजामुद्दीन हस[न] साहेब बी. ए. बी. एल जज्य निजा[म] हायकोर्ट यांचे धाकटे बंधू होत.

कोर्टमार्शल— सहावी पलटनचे सुभेदा[र] मि. शेखमहमद हुसेन यांजवर विश्वा[स] घात व चोरीचा माल घरीं लपविल्याच[ा] आरोप येऊन सरासरी तीन महिन्या पासू[न] ते नजर कैदेंत असून हल्लीं त्यांची चौकशी कोर्ट मार्शल पुढें होणार असें कळतें.

लटकी लढाई— कर्नल बीनिंग आफि[स] शिएटिंग ब्रिगिडीयर जनरल है० कां० य[ां]नीं माहे अक्टोबर सन १९०० इ० त[े] येथील फौजेची पहाणी केली होती. हल्लीं दुबारा जनरल साहेबांची स्वारी येथें येऊ[न] सर्व सैन्याची जंगी कवाईद पाहिली. नंत[र] येथील सर्व फौजेस मुकाम परभणी ये[थें] नेऊन लटकी लढाई करविली. हें काम सुमारे एक आठवडाभर चाललें होतें नंत[र] साहेब स्वारी रेल्वेनें औरंगाबादेकडेस निघू[न] गेली आणि सर्व लष्कर छावणींत वाप[स] आलें.

एक
इंगोलीकर.

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य १३ शके १८२२

हैसूर संस्थानचे दिवाण बहादूर सर शेषाद्री आयर हे आपली दिवाणगिरीचीं वस्त्रें लवकरच उतरून ठेवणार आहेत. हैसूर सरकारच्या पदरीं आज ते अदमासें १० वर्षें नोकरी बजावीत असून त्यांची कारकीर्द सुखसंपत्तीची व भरभराटीची अशी नाणवली आहे. ह्यांच्या आमदानींत

अनेक सुधारणा करण्यांत आल्या. रेलवे व कालवे करून व्यापारास व शेतीस उत्तजन दिलें. राज्याचा वसूल एक कोटीचा होता तो ८० लाखांनीं जास्त वाढविला व पूर्वींचें एक कोटीचें कर्जहि फेडून टाकलें. येणें प्रमाणें राज्याच्या अबादानीचें व बहालबढतीचें श्रेय मिळवून म्हैसूर संस्थानास दुसऱ्यांनीं कित्ता वळविण्या सारख्या लौकिकास चढविलें हें कांहीं लहानसान कृत्य नव्हे. दिवाण बहादुर आपलें काम पाहूं लागण्यापूर्वीं वर्ष दोन वर्षेंच म्हैसूरचे महाराजांस पूर्ण मुखत्यारी मिळाली होती. तोंपर्यंत सर्व राज्यसूत्रें चांगले नांवाजलेले, हुषार, व अनुभवी अशा इंग्रज लोकांच्याच हातीं होतीं. व जेव्हां हीं सूत्रें सर शेषाद्री आयर ह्यांच्या हातीं पडलीं तेव्हांच, नेटीव लोकांच्या हातून अशीं जोखमीचीं बडीं कामें होणार नाहींत व संस्थानांत अगदीं अव्यवस्था माजेल असें दुष्ट भाकीत व तर्क लोकांनीं केले होते. पण ह्या सर्वांचें यथायोग्य निरसन आयर सारख्या पुरुषानें आपल्या मुत्सद्दीपणाच्या कर्तबगारीनें करून सोडलें. व नेटिव लोक राज्यधुरंधरपणाच्या कामांत सुद्धां कसे तरबेज व दक्ष असतात हेंहि उत्कृष्टपणें सिद्ध करून दाखविलें. सरकारनें आह्मां नेटिवांस आमच्या अंगांतील सध्यां झांकून गेलेल्या पण सोन्यासारख्या गुणांस उजळी देण्याची संधी द्यावी व आमच्या जवळच्या बावन कशी सोन्यास सरकारांनीं अंगावर वापरावें हें खरें पण मातींतल्या सोन्याची त्यांना हाव मग आपुढें ह्या सोन्याची काय मातबरी !

---

सर शेषाद्री आयर यांनीं म्हैसूर संस्थानांत एक अप्रतिम अशी संस्था स्थापन करून ठेविली आहे. ती सभा विजयादशमीच्या सुमुहूर्तावर दरवर्षीं भरत असते. व ती आठ दिवसपर्यंत चालूं राहते. ही सभा लहान थोर, श्रीमान् व गरीब लोकांची होय. वर्षाचें बजेट ह्या सभेपुढें मांडलें जातें व लोकांचीं प्रश्नोत्तरें होऊन यथास्थित विवेचन व भवतिनभवति होत असते. अशा रीतीनें राज्यप्रकरणीं सर्व महत्वाच्या गोष्टींचा खल होऊन उत्तम ठरलेल्या धोरणावर राज्यकारभार लोकांच्या संमत्तीनें सुरळीत चालतो अशी ही सभा राजा व प्रजा यांचीं मनें एकवटून टाकण्याची भक्कम साखळी होय. ह्यामुळें परस्परांची प्रीति उत्तरोत्तर वृद्धिंगत होऊन प्रेमपाश दृढ होत जातो. असे मंत्री राजास सन्मार्ग दाखवितात व त्यांच्या सहाय्यानें राज्यशकट अबाधित व सुयंत्र चालतो.

---

राज्यकारभारांत आपला हात असावा अशी मनीषा व महत्वाकांक्षा मनुष्याचे अंगीं जन्मतःच वसत असते. व ही मनीषा तृप्त करून घेण्यासाठीं ते नानातऱ्हा करीत असतात व त्यांचे महत्वाकांक्षेस जागा मिळाली नाहीं ह्मणजे अर्थातच ते नाखूष होतात, व कित्येक प्रसंगीं तर ते त्याच राज्याचें अहित चिंतण्यासहि तयार होतात. ज्या प्रमाणें इंग्लंडांत हाऊस आफ् कामन्सची सभा मनुष्यास आपली महत्वाकांक्षेची उडी मारण्यास मोकळी असते तशी जागा हिंदुस्थानांत नाहीं. ही उणीव म्हैसूर संस्थानांत सर शेषाद्री आयर यांनीं भरून काढिली आहे. हेंच उदाहरण पाहून खुद्द इंडिया सरकार लोकमतांच्या अनुरोधानें राज्य करितील तर सर्व प्रजा फारच फार राजीखुषी व आनंदी राहील व सरकारासहि हात सोडवणूक होईल.

आमची राष्ट्रीय सभा ही सर्व हिंदुस्थानचें मतैक्य दाखविते व तिला राजाश्रय मिळेल तर तिच्या धोरणानें इंग्रजी राज्य चिरस्थायी होऊन आमच्या गुणांचा विकास होईल व तसाच अंगांत सणसणत असलेला पराक्रम करून दाखविण्याची अमोलिक संधी सांपडेल. राष्ट्रीय सभेस कामन्स सभेसारखी सनद व हक्क देऊन इंग्रजी राज्याची दिगंत किर्ती जाईल; व ह्या किर्तीचा आकाशांत दुमदुमत असलेला परिमळ कै. व्हिक्टोरिया राणी सरकार घेऊन फार संतुष्ट होतील व त्यांस अती कृतकृत्य वाटेल. आपण प्रेमळ अंतःकरणानें व उदार बुद्धीनें जगजाहिर असा जो जाहिरनामा हिंदुस्थानास दिला त्याचें ह्यावेळीं साफल्य झालें व ह्या प्रमाणें आपल्या नांवाचें अनंत कालचें स्मारक उभारल्याबद्दल धन्य वाटून त्या आशीर्वादरूपीं सुमनें इंग्रजी राज्यावर टाकतील यांत शंका नाहीं. असा सुयोग आणण्यासाठीं महाराणी साहेब देवापाशीं निरंतर मागणें मागत असतील, नाहीं बरें !

म्हैसूरच्या सारखी लोकमतदर्शक संस्था मांडलिक राजवाडे करूं ह्मणतील तर होण्यासारखें आहे. प्रत्येक संस्थानिकानें आपल्या पेक्षां उच्च अशा संस्थानांतील उत्तम गोष्टींचें अनुकरण केलें पाहिजे. कोणतें संस्थान आपल्यापुढें सुधारून जात आहे अशी एकमेकांत ईर्षा वागली पाहिजे. अशी वरचढ लागली ह्मणजे संस्थानें शक्तिमान् व बलिष्ट होतील. त्यांची सांपत्तिक, नैतिक, मानसिक व शारीरिक स्थिती उत्तरोत्तर सुधारेल व संस्थानची इभ्रत व लौकिक वाढेल अशी उत्कृष्ट स्थिती पाहून इंग्रज सरकारास हीं ‘ आपलीं आवडतीं ’ संस्थानें आहेत असें ह्मणवून घेण्याचा अभिमान वाटेल व यांत दोघांचाहि गौरव होईल.

---

## महाराणीचें स्मारक

महाराणी व्हिक्टोरिआ यांच्या स्मारकाची चळवळ आमच्या प्रांतीं चांगली सुरूं झाली आहे. गेल्या शुक्रवारीं मे. कमिशनर साहेब यांच्या अध्यक्षते खालीं एक जाहिरसभा भरून असें ठरलें कीं प्रांतिक वर्गणी जिल्ह्यानिहाय गोळा करावी आणि त्या रकमेनें एक औद्योगिक संस्था स्थापण्यांत यावी. या वर्गणी पैकीं कांहीं रक्कम कलकत्याच्या व्हिक्टोरिआ अजबखान्या कडेही देण्यांत येणार आहे. उमरावतीच्या सभेंत ठरल्या प्रमाणें लागलीच काल रोजीं मे. रुस्तुमजी साहेब यांनीं या जिल्ह्यांतील प्रमुख गृहस्थांची सभा भरविली आणि कालच्या काल जे आंकडे घतले तेच पांच हजारा पर्यंत पडले आहेत. मे. रुस्तुमजी साहेब हे इतके लोकप्रिय आहेत कीं त्यांचा शब्द लोक मोठ्या आनंदानें ग्रहण करितात व त्यांच्या इच्छे प्रमाणें वर्गणीचे आंकडे टाकतात. कालच्या यादींत रा. रा. खुशालराव गणपतराव देशमुख अंदुरा यांचा आंकडा ६०१ रुपयांचा असून तोच सर्वांत श्रेष्ठ आहे. त्यांच्या खालोखाल रावबहादूर दत्तात्रय विष्णु भागवत यांचा आंकडा ४०० रुपयांचा आहे. खुद्द मे. रुस्तुमजी यांनीं आपलें नांव ३०० रुपयांच्या आंकड्यानें सुशोभित केलें आहे पण लोकांच्या दृष्टीनें ह्यांचा आंकडा या पेक्षां मोठा पाहिजे आहे. इतर वर्गणीचे आंकडे मागाहून कळविण्याचा आमचा संकल्प आहे. ही वर्गणी मोठ्या राजीखुषीची आहे आणि लोकांची राजनिष्ठा व प्रेम हीं पाहिलीं ह्मणजे स्मारकाची वर्गणी मोठी जमेल यांत शंका नाहीं. स्मारकाच्या फंडाचा उपयोग औद्योगिक शाळेकडे होणार आहे. व या औद्योगिक संस्थेला शेतकऱ्यांचा वर्गही जोडण्यांत येणार आहे हें विसरतां कामा नये. या शेतकीच्या वर्गामुळें वर्गण्यांची गर्दी विशेष होईल असें आह्मास वाटतें.

---

## रामायण.

आर्य लोक कोसला सारख्या सुसंपन्न देशांत येऊन राहिले तेव्हांपासून त्यांची भौतिक सुधारणा वाढत चालली. कटजाचीं सप्तकक्ष्यात्मक मंदिरें बनलीं. पादचारांच्या रथ्या बनल्या. साळ, गहू, हरभरा, तीळ, मूग, कुळीथ, उडीद ( ७,९१,२१ ) हीं पिकूं लागलीं व लोंकर, कापूस व सणें यांचीं वस्त्रें होऊं लागलीं, बनांचीं उपवनें झालीं, अटवीचें क्षेत्र झालें, सुखें वाढलीं, लोकांचे ऐषआरामाचे मार्ग वाढले तसे नवीन धंदे निघाले. सुवर्ण, रजत, लोहादि पंचधातु, वज्र इत्यादिकांचे डागिने व भांडीं होऊं लागलीं. चित्रकलेचा उदय झाला या सर्व धंद्यांचा अंतर्भाव प्रथमतः वैश्य व शूद्र यामध्यें करीत असत परंतु हळूहळू प्रत्येक धंद्यानें आपल्या भोंवती जी लहानशी मर्यादा घातली तीच सक्त होऊन पुढें दुरतिक्रम झाली, व धंद्याची जात बनली. रामायणांत ज्या धंद्यांचा उल्लेख आहे, त्याची यादी पुढें दिली आहे. माझ्या दुर्लक्षानें कांहीं धंदे यातून वगळले असतील, परंतु यादी बरीच मोठी आहे व त्या काळच्या धंद्यांच्या स्वरूपाची ओळख करून देणारी आहे.

स्थपति–यांच्या हाताखालीं शिल्पक वगैरे काम करीत.

शिल्पक— कामाची योजना करणारे–विषम पंथा सम करणारे २,७९,३

वृक्षतक्षक— वृक्ष कापणारे

वर्धकि– तक्षकांतील भेद असावा– वऱ्हाडांत सुतारांना वाढी ह्मणतात ( साधें काम करणारे सुतार )

कर्षक– शेतकरी

खनक– खणणारे

दुर्ग विचारक– वाटाडे

सूत्रकर्म विशारदाः– सुतारांतील पोट भेद

यन्त्रक– जलप्रवाह बांधणारे

भूमिप्रदेशज्ञ– जमीनींत पाणी कोठें आहे वगैरे सांगणारे

भक्त– रोजी घेऊन राहणारे मजूर

विष्टी– सामान्य मजूर

कर्मान्तिक– महिन्याचें वेतन घेऊन राहणारे नोकर वगैरे

यंन्त्रकोविद– यंत्रें ( फेकण्याचीं वगैरे ) तयार करणारे

सूपकार– स्वयंपाकी

सुधाकार– चुना तयार करणारे

वंश चर्मकृत्— बुरूड

नट— नाटकांत सोंग घेणारे

नर्तक— नाचणारे

गणिका– गाणारणी बायका

श्रेणी मुख्य— शेटजी ( हा मात्र धंदा दिसत नाहीं )

वादित्र कुशल– बजवय्ये

सूत– १ पुराण सांगणारे, २ रथ हाकणारे

मागध– नृपवंश सांगणारे भाट

वैतालिक– राजांना पहाटेस उठावणारे

गणक– ज्योतिषी, जोशी

दैवज्ञ– वरच्या प्रतीचे जोशी असावे अयोध्येंतील शिल्पक २,८३,१२ पुढें

मणिकार– मण्यारी

कुंभकार–कुंभार

सूत्रकर्म विशेषज्ञ–साळी

शस्त्रोपजीविन्–ढाल तरवारी करणारे

मायूरक–मयूर, शुक इत्यादिक खेळणीं करणारे; किंवा मोराच्या पिसाचें काम करणारे!

क्राकचिक– करवतानें कापणारे

वेधक— मोत्यांना वगैरे वेज पाडणारे

रोचक– कांचेच्या कुप्या वगैरे करणारे

दंतकार– हस्तिदंती काम करणारे, देव्हा दन्त लेखक ?

गन्धोपजीविन्— गंन्धी

सुवर्णकार– सोनार

कंबलकारक– कांबळें करणारे

स्नापक – न्हावी

उष्णोदक – अंगमर्दन करून स्नान घालणारे

वैद्य—

धूपक– गंध्यांतील भेद असावा, अगरबत्ती वगैरे करणारे

शौंडिक–मद्य तयार करणारे.

रजक–धोबी ( किंवा रंगारी ? )

तुन्नवाय–शिंपी

ग्राम–घोष–महत्तर— गांवचे व खेड्यांचे पाटील.

cf. मित्रठरा Meheter

मेहता–Gujrathi.

शैलूष–नटांतील भेद दिसतो, नाच्या पोऱ्या हिजडे यालाच जायाजीव असें २,३०,२ मध्यें सीतेनें ह्मटलें आहे, भाडखाऊ.

कैवर्तक–मासे धरणारे कोळी.

रूपाजीवा–रांडा.

श्मश्रुवर्धन–हजाम.

इतक्या सर्व जाति किंवा हे सर्व धंदे करणारे सर्व लोक आर्यांत मोडत. यांच्या पलीकडे निषाद, चंडाल, मृतपा, आभीर आणि दस्यू हे अनार्यांत गणले जात असत निषाद पारध करीत अगर कोळ्याचें काम करीत. चंडाल नीलवस्त्र परिधान करून लोखंडाचे अलंकार घालीत. यांचे केंस मोकळे असत. आभीर ( अलिकडील आहीर–गाढव हाकणारे कुंभार ) व दस्यू ( चोरी करणारे ) हे अनार्यच होत. दस्यूचा अर्थ चोरी करणारा हा पाठीमागचा आहे. या शिवाय अनार्य लोक रामायणांत आले आहेत त्यांचीं नांवें–शक, यवन, कांबोज, बर्बर, म्लेंच्छ, “ पल्हव ” या लोकांचा उल्लेख आहे, व रामायणांत त्यांचें नांव वर सांगितलेल्या लोकांतच घातलें आहे. पण हे

खरोखर आर्यवंशा पैकीं होत. यांची भाषा पल्लवी किंवा झेंद, ही संस्कृत भाषेची जवळची बहीण ह्मणून डा. हौ यांनीं सिद्ध केलें आहे.

( पु० चा० )

गेल्या होलिकेच्या सणांत यवतमाळास हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा वार्षिक मेळा जमला होता. यवतमाळ हें स्थळ अगदीं बाजूला आहे व खानेसुमारीची धांदल होती ह्मणून पुष्कळशा गृहस्थांस जातां आलें नाहीं तरी १५० मंडळीचा जमाव भरला होता. यवतमाळकरांनीं बातबेत फार चांगला ठेविला होता. त्यांची उत्कृष्ट व्यवस्था पाहून सर्व लोकांस मोठा आनंद वाटला. अध्यक्षस्थानीं रा० रा० गणेश नागेश सहस्त्रबुद्धे वकील इलिचपूर हे विराजमान होते. यंदाच्या सभेंत एक निराळाच ठराव झाला आणि तो प्रस्तुतच्या कालमानाला अगदीं यथायोग्य आहे. समाजाचा एक फंड उभारण्यांत येणार आहे. या फंडाच्या रकमेंतून कांहीं तरी व्यापाराची शाळा काढण्याचा हेतु आहे. ही गोष्ट दर्यापूरच्या सभेपुढें प्रथम मांडण्यांत आली आणि इतक्या वर्षांच्या विचारानें ती सर्वांस पसंत वाटली. खुद्द अध्यक्षांचा निबंध 'यांत्रिक कला व उद्योग' या विषयावर होता. त्यामुळें या फंडाच्या विषयाला मोठी मदत मिळाली. रा. रा दिनकरराव हरकोरे यांनी आपले सामाजिक सुधारणे संबंधाचे विचार इंग्रजींत कळविले आणि त्याच प्रमाणें रा० रा० बोधनकर वकील यांनीं शिक्षणपद्धती विषयीं संभाषण केलें. रा० रा० मोरोपंत जोशी यांनीं शारीरिक शिक्षणा संबंधानें सुरस व्याख्यान दिलें आणि तें श्रोतृसमाजास आवडलें. पुढील सालची सभा इलिचपूरास भरावी असा ठराव करण्यांत आला. एकंदरीनें यंदाचा समारंभ फार नामी झाला आणि ही गोष्ट यवतमाळच्या मंडळीस मोठी भूषणाची होय.

मे. रुस्तुमजी साहेब याचे लेख बंदुकीच्या गोळी प्रमाणें असतात. त्यांच्या लेखणींतून जे बार उडाला तो बिनचूकपणें आपलें कार्य करून टाकतो. गेल्या दिवाणी कामाच्या रिपोर्टांत त्यांनीं असा अभिप्राय दिला होता कीं नायब तहशिलदाराकडे दिवाणी काम देण्यापासून कामही चांगलें होत नाहीं आणि विनाकारण पक्षकारांचा फायदा न होतां त्या अधिकाऱ्यांस शीण मात्र होतो हा अभिप्राय मे. जुडिशिअल कमिशनर साहेब यांस फार पसंत पडला आणि त्यांनीं अलिशान रेसिडेंट यांच्या मंजुरातीनें नायब तहशिलदारांकडील दिवाणी काम काढून घेतलें आहे. ही गोष्ट फार चांगली झाली आणि तिचें श्रेय आमचे साहेब बहादूर मे. रुस्तुमजी यांस आहे.

**The Berar Samachar**

MONDAY MARCH 18 1901

It is a right step that Mr. J. A. Crawford takes the lead in organizing the Provincial Memorial Fund. He is our popular Commissioner and the last famine has brought him in direct contact with the people. His kind and liberal policy of the famine has won for him a good name and it cannot be but his appeal for contributions towards the memorial will be met with a hearty response from the people. On Friday last he held a general meeting at Amraoti for the purpose of starting this memorial fund. The notables of the six districts both official and non—official were invited to the meeting and Mr. Crawford well succeeded in infusing the spirit of making the memorial question a great success. The central stir of the memorial now spreads through out the six districts and we hope that ere long we will have all our people join with heart and soul in this movement.

The Victoria memorial is the most vital question of the day. It is no wonder that an excellent sovereign should evoke high sentiments of loyalty. The sacred memory of Victoria the Good will for ever be green and glorious in the minds of the people. Her sovereignty was the august founder of peace, safety and an inexhaustible source of blessings of a civilized life. It is not, however, so much for what she gave and we received that we shall ever remember her good name but for the vast potentiality of the greatest good that she has left in store for our people. We wish to immortalize her name in the potential activity of a new and prosperous era for which the reign of our Victoria has paved our way. It is on that account that we welcome the proposal of the Victoria Memorial Fund.

Mr. Crawford did a noble service in yielding to the wishes of the people when he saw that the bent of the public mind was greatly towards establishing an industrial institution. We shall not have a perfect model of a technical school but we shall be making a beginning in this direction. Such a memorial will thus be a great symbol of the modern spirit and will be the cheristed object of the people. The contributions from the people are expected to be munificent and with the help of the local bodies supplemented by liberal grants from the government the memorial will be worthy of the provincial traditions.

The Victoria Hall also is, no doubt, before the public mind and the eloquent appeal of Lord Curzon will not fail to claim an approval and acceptance at the hands of the Berar public. A certain percentage will be allowed over the total collections and we hope to see a noble and worthy idea of an all-Indian memorial fully realised.

The charm however of Lord Curzon's proposal does not stand the test of distance. The further we proceed from Calcutta the less attractive the scheme becomes There are no two opinions about the advisability of a memorial but one province differs from another when we come to the direct project of the memorial. It is natural that each province should like to have a provincial memorial; and we shall be glad if this ambitious emulation between one province and another comes to a successful issue.

Let us not make little of the technical institution that our Victoria memorial is going to found in the midst of our province Such small beginnings secure great ends. Even if there be the infusion of the new spirit of industrial life we shall have gained a strong footing in the right direction. Our educational institutions fail deplorably to equip us for the race that we are to run in the keenly competitive fields of industry and commerce. We are a backward nation and know very little of the new inventions in the spheres of science and arts; and our people have no standing in the present competition with the nations of the world. We represent a dying nation and if we ever rise to the condition of a living nation like England we shall do so only by the industrial and commercial education that we now intend to spread through the Victoria memorial.

OUR MAHOMEDANS AND THEIR EDUCATION

( Communicated )

It is with much pleasure that we note that our Deputy Educational Inspector of Hindustani Schools Mr. Nizaamuddin Ahmed who has the proud honor of being a M. A. of two Universities, is taking a good deal of appreciable interest in the cause of education of the much backward community of our Mahamedan brothren by delivering very impressive and eloquent lectures and thus arousing them from their deplorable sleep. He has made it a point while on tour to hold public meetings of the Mahomedans and advise them to endeavour to their utmost to educate their children and ameliorates their condition. Since his appointment ( and we must thank Mr. Patwardhan for such an excellent selection ) anjumans or societies have been started with the principal object amongst others of devoting both time and money towards improvement. He has by quoting verses, from the Koran—the sacred Book of the Mahomedans, proved that energy and money spent towards the improvement of a community is better than individual prayers for individual greatness, and we are glad to find that his exertions are receiving a good reward in return. Only the other day ( 5th March ) he delivered a very good lecture on this subject at Morsi before a mixed assembly of Hindus and Mahomedans and establisbed an anjuman as he did at Akote and other places. So far as we know the Anjuman Islam at Akola under the patronage of Mr. Anverali, under the presidency of Mr. Nizaamuddin well assisted by Mr. Saleem Khan and under the good Secretaryship of Mr. Bushruddin is doing excellent work and we have us doubt that in course of time this anjuman in particular will show good results well worthy of Government patronage. In this connection we must mention the name of Mr. Muzhur Hussain also who is devoting much of his leisure time in this cause and we wish them all every success in their undertaking.

## वऱ्हाड

हवापान— उष्णकालाला प्रारंभ झाला असें दिसतें. हवा स्वच्छ व निरोगी आहे. किरकोळ दुखण्या शिवाय सार्वजनिक आरोग्याला कोणतीच गोष्ट प्रातिकूल नाहीं.

वऱ्हाडचे सेक्रेटरी मि. जार्डीन हे रजेवर जात असल्यामुळें त्यांच्या हैदराबाच्या जागीं क्याप्टन हेग यांस नेमण्यांत आलें आणि त्यांच्या सिव्हील व सेशन जज्जाच्या जागीं क्याप्टन ग्यारेट यांस नेमण्यांत आलें.

उमरावतीच्या डिपुटी कमिशनरच्या जागीं मि. मारिस हे रुजूं झाले आणि क्याप्टन हार्सबरो हे इलिचपूरच्या डिपुटी कमिशनरच्या जागीं दाखल झाले. त्यांच्या सन्मानार्थ उमरावतीच्या लायब्ररींत गेल्या ७ वे तारखेस पानसुपारींचा मोठा समारंभ झाला,

राव बहादूर देवराव जयकृष्ण एक्स्ट्रा-असि. कमिशनर, वून्हारा हे या महिन्या अखेर पेनशन घेणार असल्यामुळें त्यांच्या जागीं मि. एदलजी संजाना साहेब यांस वून्हाऱ्यास पाठवून रा० रा० रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. यांस येथील स्मालकाज कोर्टाचे जज्ज नेमणार आहेत. आणि शेवटच्या जागीं रा० रा० रंगनाथ विष्णु तहशीलदार, उमरावती यांस आफिशिएटींग एक्स्ट्रा असि० कमिशनर नेमणार असल्या विषयीं वर्तमान आलें आहे.

चिखलीचे तहाशिलदार रा. रा. वासुदेव विठ्ठल चांदेकर हे आजारीपणाच्या रजेवर गेले मुळें त्या रजेंत रा. रा. दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए. यांस तहाशिलदार व रा. रा. रामकृष्ण अअमृत देशपांडे यांस नायब तह शिलदार नेमण्यांत आलें.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं रा. रा. भास्कर सखाराम जयवंत यांस उमरावती येथें गेल्या ९ वे तारखेस देवाज्ञा झाली. हे पेनशनर सुखवस्तु गृहस्थ होते. १८८९ पर्यंत ते जुडिशिअल कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट होते. हे जुन्या अधिकाऱ्यांपैकीं नांवाजलेले होते. स्वभावानें शांत, सरळ व एकमार्गी होते.

दुसरा अति दुःखकारक मृत्यु गेल्या पंधरवड्यांत घडला तो आमचे लोकप्रिय डाक्टर गोविंद व्यंकाजी खोत यांचा होय. हे तीन चार महिन्यापासून मधुमेहाच्या विकारानें आजारीच होते. त्यांस यातना फार होत होत्या तेव्हां मरण आलें हें बरें! रावसाहेब खोत हे डाक्टरीच्या धंद्यांत चांगले भरभराटीस चढले. गृहस्थ मोठा परोपकारी, गरिबांचा कनवाळू व स्नेहाचा भुकेला असा होता. डाक्टर खोत मृत झाले ही मोठीच हानी होय. ईश्वर त्यांच्या आत्म्याला चिर शांति देवो!

## वर्तमानसार

म्हैसूरच्या महाराजांनीं एक वाघ मारला.

राजकोट येथील मि. सिताराम नारायण पंडित, बॅरिस्टर ॲट लॉ यांनीं मिसेस ॲनी बिझांटनें काढलेल्या हिंदू कॉलेजला १६०,०० रुपयांची देणगी दिली. औदार्य आहे.

व्यतेला आरोग्यरक्षणासंबंधीं उपदेश करण्याकरितां बडोदे सरकारांनीं एक उपदेशक नेमण्याचे ठरविलें आहे. स्तुत्य होय.

सुमारे २४ तासांत कातडे कमाविण्याची देशी युक्ती एकानें काढली आहे.

ड्राईंग रुममध्यें कोणत्याही स्त्रीच्या भेटीच्या प्रसंगीं तिच्या गालाचा मुका घ्यावयाचा असा इंग्लंडच्या राजाचा प्रताप आहे. नूतन राजे ही चाल चालू ठेवतात किंवा नाहीं हें पाहणें आहे.

व्हिक्टोरिया मेमोरियल फंडाचे व्हाइस प्रेसिडेंट होण्याविषयीं व्हॉइसरॉय साहेबांनीं निजामास विचारलें व त्यांनीं ते मोठ्या आनंदानें कबूल केलें. दे० से०

पत्यालच्या संस्थानास कर्जाचा बुजबुजाट झाला आहे पण कलकत्याच्या स्मारकास एक लाख रुपये तयार.

कित्येक बैरागी वगैरे आपल्या पंथाची खूण ह्मणून त्रिशुळासारखें वळविलेले लोखंडी गज हातांत घेतात, हें हत्यारांच्या कायद्याविरुद्ध होतें, असें लखनौ येथील माजिस्त्रेटांनीं ठरविलें आहे. सु०

हाऊस आफ लार्डसच्या सभेमध्यें लार्ड वुल्स्ली व लार्ड ल्यान्सडाऊन यांचे बरेच दोन हात झाले. दोन्ही पक्षाचा कडाक्यांचा वाद सुरूं झाला. हा वाद मिटावा अशी मि० बाल्फोर यांनीं सूचना आणतांच सभागृहांत बजबजपुरी माजली. शेवटीं पोलिसांच्या मदतीनें कांहीं न्याशनालिस्ट लोकांस बाहेर घालवावें लागलें व पोलिसलाही ज्यांनीं दाद दिली नाहीं अशा नऊ सभासदांना पार्लमेंटामधून घालवून द्यावें अशी मी उद्यां सूचना आणणार आहे अशी मि० बालफोर यांनीं शेवटीं पार्लमेंटला नोटीस दिली. क.

इंग्लंडमध्यें पाण्याखालून चालणाऱ्या बोटी तयार करण्याचा विचार आहे.

कैद्यांना वाईट रीतीनें वागविल्याबद्दल कानउघाडणी करण्यासाठीं कोणी ब्रिटिश आफिसर डीवेटकडे गेला असतां त्याला डीवेटनें चाबकाखालीं मारल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे.

ट्रान्सवालच्या लढाईसाठीं आजपर्यंत ८ कोटी १९ लक्ष पौंड खर्च झाला असून प्रत्येक आठवड्याला हल्लीं १२॥ लक्ष पौंड खर्च होत आहे. का०

देवस्थान व धर्मादाय या संबंधानें एक कायदा करण्याचा एक मसुदा हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौंसलापुढें मि. आनंद चार्लू यांणीं आणिला आहे व तो आतां सिलेक्ट कमेटीकडे तपासण्यास गेला आहे. देशांत भिक्षेकरी असणें हें देशास दरिद्री करणें आहे. आपणास कांहीं धंदा करवत नाहीं असें ह्मणणाऱ्यांस त्यांच्या योग्यते प्रमाणें धंदा देण्याच्या सोई करून भिक्षा मागणाऱ्यांस शिक्षा करण्याचा कायदा केला तर त्यापासून देशाचें फार मोठें हित होईल. आमच्या सुधारकांनीं संमत्तीवयाचा कायदा जर करून घेतला तर हा भिक्षेकऱ्याचा कायदा करून घेण्यास त्यांस कां सुचूं नये हें समजत नाहीं.

रशियाच्या कांहीं भागांत भयंकर दुष्काळ सुरू आहे.

चीनांतल्या एका भागांत भयंकर दुष्काळ सुरूं झाला असून शेकडो माणसें पटापट मरत आहेत असें सांगतात. ईश्वरच कोपला असावा!

विष्णुपंत—काय हो, आतांशा हीं वर्तमानपत्रें फारच कडक लेख लिहूं लागलीं आहेत भितीच वाटत नाहीं.

नारोपंत—फिर्याद झाली कीं दुप्पट तिप्पट प्रती खपूं लागतात असा मनाचा ग्रह झाला आहे ना? " मोलें घातलें रडाया ॥ नाहीं असूं आणि माया "

जान्या—तुझ्या घरीं दरसाल धारा व सूल होण्याकरतां जप्त्या कां रे येतात? उ. राऊ भात तर ९-९ खंडी विकतोस.

बेंड्या कुळकर्ण्याकडे गेलों तर शिव्या देतो; आज नाहीं उद्यां ह्मणतो; तीन खेपाचें गाडीभाडें १॥ रु. खर्च; व घरच्या कामाचें नुकसान करून घ्या; त्यापेक्षां जप्ती आली कीं नोटिस फी चार आणे देऊन तेव्हांच पैसा भरला ह्मणजे हजार वाच्यानें फायदेशीर. ठा० अ०

---

## नोटीस

(१) मे० रणछोडदास लालजी भाटे म्यानेजर.

(२) मे० कावजी फ्रामजी इंजिनिअर

(३) मे० किसन रामाजी मारवाडी जीनफिटर

अकोला मूलजी जेठाचे कंपाउंडांत या त्रिवर्गास:—

मी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मला आपल्या कंपाउंडांत नोकरीस राहून ४-४॥ महिने होत आले. आतां माझा विचार नोकरी सोडून घरीं जाण्याचा आहे. मी येत्या १९ तारखेपासून कामावर येणार नाहीं. तर माझा हिशोब करून माझे पैसे चुकते करावेत. आपले कामाचा बंदोबस्त आपण करावा. ह्मणून आपणांस अगाऊ कळविलें आहे. कळावें. तारीख १२ मार्च १९०१ इसवी.

सही (गुजराथींत)

भगवान व० फकिरा जीनफिटर राहणार भडोच हल्लीं वस्ती अकोला

---

## नोटीस

रा. रा. मिठाराम हलवाई दुकान अडगांव यांस— खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं, माझा जेठ सोनभट बिन रामकृष्ण राहणार अडगांव यांनीं आपल्याजवळ नगद रोख रुपये ३०० तीनशे धरवर ह्मणून ठेवले हे बहुतेकास माहीत आहे. माझा जेठ सोनभट हा मरण पावल्यास सुमारे ६ महिने झाले. माझ्या जेठानें पुष्कळ वेळां बहुतेकांच्या देखत आपली धरवर मागितली तेव्हां तुह्मी देतो देतो असे ह्मणत होतां परंतु त्यास परत दिली नाहीं. पुढें अकस्मात हवेच्या उपद्रवानें माझा जेठ मरण पावला त्याचे दुसरे दिवशीं त्यांची उत्तर क्रिया करण्या करितां पैसे मागितले असतां तुह्मी अगदीं नाकबूल झाले. पुढें माझा नाइलाज होऊन मी दुसऱ्या पाशीं डागीना गहाण ठेऊन कार्य उरकून टाकलें. तुह्मी फार विश्वासु ह्मणून तुह्मापाशीं माझ्या जेठानें धरवर ठेविली परंतु अशा प्रकारचा दगा कराल असे जर पूर्वींच त्याला कळतें तर त्यानीं तुह्मापाशीं मुळींच आपली धरवर ठेविली नसती. असो जें झालें तें झालें. ही नोटीस पावल्या पासून १९ दिवसांच्या आंत धरवर ३०० रुपये आमची आह्मास द्यावी व माझी पावती घ्यावी, असे मुदतीच्या आंत न केल्यास मी फिर्याद करून या नोटीशीच्या खर्चा सुद्धां व कोर्ट खर्चा सुद्धां पैसे भरून घेईन कळावें.

सही

सुंदरा बाई जवजे नारायण भटजी उंबरकर राहाणार अडगांव.

---

## नोटीस

मारुती, आपाजी व कृष्णाजी वल्हद दर्याजी गोठे राहणार तोंडगांव जाहागीर तालुके वासीम यांस.

पुंजाजी लक्ष्मण गोठे राहणार तोंडगांव हल्लीं मुक्काम बुलडाणें यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे तोंडगांव जाहागीर तालुके वासीम येथील शेतें खालीं लिहिले प्रमाणें:—

१ शेत सर्वे नंबर १४३ एकर ५८१२ आकार १७ निशानी चिरबंदी यांतील ½ निमे हिस्सा.

१ शेत सर्वे नंबर १९६ एकर २२८३८ आकार २० निशानी चिरबंदी ½ हिस्सा.

१ शेत सर्वे नंबर २७१ एकर ६८१० आकार ८॥ निशानी अखेरचा ½ हिस्सा

१ शेत सर्वे नंबर २१७ एकर १३८३६ आकार १२ निशानी कळवती ½ हिस्सा.

सदर्हू दिलेले चार नंबरांत आमचे वडिलोपार्जित ½ हिस्से आहेत. सदर्हू ½ निमे हिस्स्याची जमीन तुमचे कडेस शेत सान्यावर वहितीस ठेविली आहे व मौजे मजकूर येथील परकोटाचे आंतील व बाहेरील वडिलोपार्जितचे जागेयांतील ½ हिस्सा तुमचे देखरेखी खालीं आहे. सदर्हू शेतें व जागा तुह्मी आपलें कर्जांत फेडित दुसऱ्यास लिहून देण्याचा इरादा केला आहे असें समजतें तरी या नोटीसीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं सदर्हू वर लिहिलेली मिळकत दुसरे कोणास गहाण अगर खरिदी देऊ नये. दिली असल्यास त्याजबद्दल आह्मीकोणतेच जबाबदार नसून विश्वासघाताबद्दल तुमचेवर फौजदारींत फिर्याद केली जाईल. शिवाय कबजा घेण्याकरितां कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां भरून घेतला जाईल कळावें तारीख २९।२।१९०१

सही

पुंजाजी लक्ष्मण गोठे राहणार बुलडाणा.

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे तोंडगांव ज्याहागीर तालुके वासीम येथील शेत सर्वे नंबर १४३,१९६,२७१,२१७ या प्रत्येक नंबरांत आमचा ½ निमे हिसा वडिलोपार्जितना असोन शिवाय तेथील परकोट परकोटाचे आतील व बाहेरील भाऊ बंदाचे हिशाची जागा आहे त्यांत ही ½ निमे हिसा आहे. सदर्हू हिश्याची जमीन आह्मी मारुती, आपाजी व कृष्णाजी वा दर्याजी गोठे राहणार तोंडगांव ज्याहागीर यांजकडेस शेत सान्यावर वहितीस ठेविली असून जागाही त्यांचे देखरेखी खाली ठेविली आहे. आमचे एकण्यांत असें आले आहे कीं सदर्हू तीन इसमानी सदर्हू नंबर व जागा ही दुसऱ्यास लिहून देण्याचा विचार केला आहे. तर वरील इसमा पासून वर लिहिलेली शेतें व जागा कोणी खरीदी किंवा गहाण घेऊ नयेत. घेतली असल्यास त्याजबद्दल जबाबदार आह्मी नसून कोणतीच तक्रार ऐकिली जाणार नाहीं. जर कोणी घेतल्यास आजवर दिवाणींत फिर्याद करून कबजा घेण्यात येईल. कळावे ता. २९।२।१९०१ इ०

(सही)

पुंजाजी लक्ष्मण गोठे राहणार बुलडाणा.

---

भारतधर्म

## सर्वांस फुकट

(आबालवृद्धांना उपयुक्त मासिक पुस्तक.)

सनातन भारतधर्ममहापरिषदेच्या हेतूप्रमाणें धर्म—नीतिज्ञानाचा विस्तार, बोध व करमणुकीसहीत सुलभ रीतीनें होण्याकरितां 'मनीषिमार्गमंडळी'च्या कित्येक वर्षांच्या परिश्रमानें हें मासिक पुस्तक सुरू होणार. शके १८२३ च्या चैत्रपासून दरमहा निघणार.

या प्रथमवर्षी, पांच हजार प्रतीस वर्गणीदार होईपर्यंत फुकट! पुढच्या वर्गणीदारांना वर्षास टपालसह वर्गणी १ रु० ह्मणून मागविण्याची त्वरा करा!

मुंबई—खटावागपाडा.

म्यानेजर.

आर्यभिषक्.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ १ हाशील ०।१२

सहामाही " २ " ०।८

साल अखेर " ७ " १ ०।८

किरकोळ अंकास ......................०।४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........ ०।१ ०।६

दुसरे खेपेस .... .... ....०।१

Annual in arrears ...

Six monthly......... 3 ............... 8 as

ingle copy ..............................4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...8 as

REGISTERED N. No.

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXV AKOLA MONDAY 25 MARCH 1901 NO 11

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख २५ माहे मार्च सन १९०१ इ० अंक ११


## काळ.

( संपादकः- शि० म० परांजपे, एम्. ए. )

ह्या वर्तमानपत्राचा आकार येत्या वर्षापासून पूर्वीपेक्षां अधिक मोठा केला जाणार आहे. पूर्वी प्रमाणेंच टाइप बारीक ( पायका ) ठेवून पत्राचा कागद सुपररॉयलचा घालण्याचें योजिलें आहे. तरी नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं त्वरा करावी.

वर्गणीचे दरः- पुण्यात १ रुपया. मुंबईस १।४; बडोद्यास १।८ व इतर ठिकाणीं १।१३.

काळ आफिस पुणें. } व्यानेजर काळ.

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग् बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षात एकहजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

### जाहिर नोटीस

खालीं सही करणार यांजकडून सर्वत्र लोकांस या नोटिसीनें कळविले जातें कीं आमचे जवळून, रा० हरी आपा राम आपाणी राहणार अंजनी खुर्द तालुके मेहेकर हल्लीं मुक्काम साकळी तालुके चिखली जिल्हा बुलडाणा, यांनीं मूलथाप देऊन मुखत्यार पत्र करून घेतलेले आज तारखेस रद्द केले आहे करितां आमचे नावावर किंवा ज्यांत आमचा संबंध आहे असा कोणी सदरहु मनुष्याशीं व्यवहार केला असल्यास त्याजबद्दल आह्मी जबाबदार नाहीं, ह्मणून या नोटिसीनें कळविले आहे. कळावे तारीख १९ माहे मार्च सन १९०१ इसवी.

सही

उत्तमराव माधवराव देशमुख रहाणार माकोडी दस्तुर खुद्द.

### नोटीस.

शंकर लक्ष्मण देशपांडे राहणार अकोट यांसः—

खाली सही करणार याजकडून अशी नोटीस देण्यांत येते कीं तुमच्या नांवावर प्रगणे अकोट येथील देशपांडेपणाला रुसूम जो आहे त्या रुसूमांत पुरूषोत्तम गोविंद देशपांडे यांचा निम्मे हिसा जातो, बाकी जो रुसूम आहे त्यंत निम्मे हिस्सा आमचा व निम्मे हिस्सा तुमचा असा ठराव दि० मो० नं० १९१ यांत सिव्हील ज्यडज्य

——

१८९७

साहेब कोर्ट अकोले यांनीं केला आहे व त्या मुकदम्यात सुद्धा आमचे हिंशाचे संबंधानें तुमचा कबूल जबाब होता. परंतु फिर्याद झालया नतरचा देशपांडेपणाचें रुसमाती ल आमचा हिस्सा आजपर्यंतचा आह्मास दिला नाहीं व तुह्मी रुसमाचा पैसा घेऊन गेला सबब अशी नोटीस देण्यांत येते कीं जो पैसा तुमचेकडून घेणें आहे तो आजपासून आठ दिवसांत द्यावा न दिला तर तुमचे नाव पेएबल आरडर यातून काढले जावें असा अर्ज दिपुटी कमिशनर साहेब बहादूर याचें कोर्टात केला जाईल. कळावें तारीख २० माहे मार्च सन १९०१ इसवीं.

सही

गोपाळ खुशालराव वकील.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे तोंडगांव ज्याहागीर तालुके वासीम येथील शेत सर्वे नंबर १४३,१९६,२७१,२१७ या प्रत्येक नंबरांत आमचा ½ निमे हिसा वडिलोपार्जितचा असोन शिवाय तेथील परकोटाचे आंतील व बाहेरील माऊ बंदाचे हिशाची जागा आहे त्यांतही ½ निमे हिसा आहे. सदर्हू हिश्याची जमीन आह्मी मारुती, आपाजी व कृष्णाजी वा दर्याजी गोटे राहणार तोंडगांव ज्याहागीर याजकडेस शेत साऱ्यावर वहितीस ठेविली असून जागाही त्यांचे देखरेखी खाली ठेविली आहे. आमचे एकण्यात असें आले आहे कीं सदर्हू तीन इसमानी सदर्हू नंबर व जागा हीं दुसऱ्यास लिहून देण्याचा विचार केला आहे. तर वरील इसमा पासून वर लिहिलेली शेते व जागा कोणी खरीदी किंवा गाहाण घेऊ नयेत. घेतली असल्यास त्याजबद्दल जबाबदार आह्मी नसून कोणतीच तक्रार ऐकिली जाणार नाहीं. जर कोणी घेतल्यास त्यानवर दिवाणांत फिर्याद करून कबजा घेण्यात येईल. कळावे ता. २९।२।१९०१ इ०

( सही )

पुंजाजी लक्ष्मण गोटे राहणार बुलडाणा.

### नोटीस

मारुती, आपाजी व कृष्णाजी वल्लद दर्याजी गोठे राहणार तोंडगांव जाहागीर तालुके वासीम यांस.

पुंजाजी लक्ष्मण गोठे राहणार तोंडगांव हल्लीं मुक्काम बुलडाणें यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे तोंडगाव जाहागीर तालुके वासीम येथील शेतें खालीं लिहिले प्रमाणें:—

१ शेत सर्वे नंबर १४३ एकर ५८१३ आकार १७ निशानी चिरबंदी यांतील ½ निमे हिस्सा.

१ शेत सर्वे नंबर १९१ एकर ९२८३८ आकार २० निशानी चिरबंदी ½ हिस्सा-

१ शेत सर्वे नंबर २७१ एकर ६०१० आकार ८॥ निशानी अलेरचा ½ हिस्सा

१ शेत सर्वे नंबर २१७ एकर १३८३६ आकार १२ निशानी कळवती ½ हिस्सा.

सदर्हू दिलेले चार नंबरांत आमचे वडिलोपार्जित ½ हिस्से आहेत. सदर्हू ½ निमे हिस्स्याची जमीन तुमचे कडेस शेत साऱ्यावर वहितीस ठेविली आहे व मौजे मजकूर येथील परकोटाचे आंतील व बाहेरील वडिलोपार्जितचे जाग्यांतील ½ हिस्सा तुमचे देखरेखी खालीं आहे. सदर्हू शेतें व जागा तुह्मी आपलें कर्जांत फेडित दुसऱ्यास लिहून देण्याचा इरादा केला आहे असें समजतें तरी या नोटीसीनें तुह्मास कळविण्यत येते कीं सदर्हू वर लिहिलेली मिळकत दुसरे कोणास गाहाण अगर खरिदी देऊ नये. दिली असल्यास त्याजबद्दल आह्मी मुळींच जबाबदार नसून विश्वास घाताबद्दल तुमचेवर फौजदारींत फिर्याद केली जाईल. शिवाय कबजा घेण्याकरितां कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां कबजा घेतला जाईल कळावें तारीख २९।२।१९०१

सही

पुंजाजी लक्ष्मण गोठे राहणार बुलडाणा.

## रामायण

[ अंक १० वरून पुढें ]

अनार्यां विषयीं आर्यांचा मोठा तिरस्कार असे. त्याचें साक्ष ही आहे कीं "अनार्य" हा शब्द शिवी दाखल योजीत. "अनार्य जुष्टमस्वर्ग्य" ही शब्दांची दुक्कल संस्कृत वाङ्मयांत प्रसिद्ध आहे.

आर्य व अनार्य जाति ज्या एका राजाच्या अमलाखालीं असत त्यास राष्ट्र ह्मणतां येईल. या राष्ट्राचा अधिपती कोसल देशचा राजा सम्राट असे. ह्मणजे त्याच्या ताब्यांत इतर मांडलीक राजे असत, हें नियमितपणें किंवा मागणी येईल तेव्हां करभार देत असत. युवराजाभिषेक किंवा हयमेध इत्यादिक मोठे समारंभ होत त्या वेळीं यांना आमंत्रण होत असे, व यांच्या कडे कांहीं कामें वांटून दिलीं असत. मोठ्या राजकारणांत यांची सल्लामसलत राजा घेत असे. परंतु स्थानिक राज्यकारभारांत तो हात घालीत असे असें दिसत नाहीं.

कोसल देशांत राजाचा अधिकार चांगला बसला होता अराजकाचे अनर्थ रामायणांत चांगले वर्णिले आहेत, ( २,६७ ) राजा नसेल तर स्वत्व राहणार नाहीं व सर्व एकमेकांस मत्स्या प्रमाणें खातील, व्यापार बंद होईल, योग क्षेम चालणार नाहीं, सत् किंवा साधु, असत् किंवा असाधु यांची निवड व्हावयाची नाहीं, सत्य व धर्म यांची प्रतिष्ठा व्हावयाची नाहीं, इतकेंच नाहीं तर उत्सव, समाज, वनांत आणि उपवनांत होणारी चर्चा व शास्त्रवाद, यात्रा वगैरे सर्व बंद पडतील. एका वाक्यांत त्यावेळचे राजा संबंधी मत संगृहीत केलें तर असें ह्मणतां येईल कीं "राजा हा राष्ट्राचा पिता." पिता ज्या प्रमाणें आपल्या मुलांचें लालनपालन करितो त्या प्रमाणें राजानें आपल्या प्रजेचें लालन व पालन केलें पाहिजे. त्यास या जगांत देवाचा अवतारच मानीत. यम, कुबेर, शक्र व वरुण यांचे दंड, दातृत्व, पालन व नियमन हे विभक्त गुण त्यामध्यें एकवटून त्यांत वृत्त संपन्नतेची भर पडल्यानें तो यांहूनही अधिक आहे, असा समज असे. त्याच अधिकार सर्व प्रजेवर चालत असे. अनुग्रह निग्रह करण्याला तो समर्थ असे.

सल्ला मसलत करण्याला त्याला सचिव, वृद्ध, ऋषि, पौरांतील श्रेष्ठ नैगम हे असत. पौर आणि जानपद यांमधील भेद या वेळीं दृढ झाला होता. पण ही जी सभा होती तिला कांहीं हक्क असतील अशी आपली समजूत झाली तर ती चुकीची होईल. रामाला यौवराज्य देण्याचा निश्चय करून आपलें मत पौरजानपदांस पटतें काय हें पहाण्याकरितां दशरथानें ही सभा भरविली. त्या वेळीं त्याचें भाषण सर्वांना ऐकूं येण्याजोगें व आनंदजनक झालें त्यांतील भावार्थ असाः— इक्ष्वाकु वंशातील राजांनीं पुत्रवत् आपलें पालन केलें, तसें मी ही केलें. मी आतां वृद्ध झालों आहें; तेव्हां माझी अशी इच्छा आहे कीं हें राज्यकारभाराचें ओझें रामावर टाकून आपण मोकळें व्हावें. मला वाटतें आहे कीं

त्याच्याकडून हें काम झपेल तर आपलें मत माझ्या मता प्रमाणेंच असेल तर मला अनुमत द्या. कारण मला जरी हा विचार योग्य वाटत आहे तरी आपणाला दुसरा विचार गोड वाटत असेल तर सांगा. यद्यप्येषा मम प्रीतिर्हितमन्यद्विचिन्त्यताम् । अन्यामध्यस्थाचिन्तातु विमर्दाभ्यदिकोदया । कारण आपण तटस्थ अहां आपणाला या प्रकरणांत राग द्वेष नाहीं. तेव्हां आपला विचार पूर्वापर पक्षांच्या संघर्षानें दुसरा व माझ्या विचाराहून जास्त शहाणपणाचा असण्याचा संभव आहे." यात पौरजान पदांना दशरथानें मोठेपणा दिला ही गोष्ट खरी; व लोकांनींही टाळ्यांचा गजर करून आपला होकार दिला. पण उलट उत्तर दिलें असतें तर दशरथानें रामाला युवराज-पद दिलें नसतें काय! मला वाटतें दिलें नसतें असें नाहीं. "राजा कालस्य कारणम्" राजानें मनांस वाटेल तें केलें असतें. प्रजेचें अनुमत मिळालें तर दुधांत साखर इतकेंच; न मिळालें तरी दूध गोड तें गोडच. कारण कैकेयीनें वरदान पुढें केल्यानें हा व्यूह ढासळला. तेव्हां राजानें नाखषीनें ह्मणा कसेंही ह्मणा रामाला आरण्यांत पाठविण्याचा निश्चय केला. तेव्हां ही सभा कोठें होती? तिचें अनुमत कोठें गेलें? दशरथच ह्मणतो पापीणी कैकेयीनें आग्रह धरिल्यानें मी वृद्धांचा व मन्यांचा विचार घेतला नाहीं. मित्रांनां, अमात्यांनां व नैगमांना. पुसलें नाहीं. स्त्री निमित्तें मोहानें हा अनर्थ एकदम (विचार न करिता) पडवून आणला. जो राम प्रजेला आपल्या पुत्रा प्रमाणें लेखी, ज्यांच्या उत्सवानें आनंदीत होत असे, त्यांनां दुःख झालें कीं लागलाच दुःखी होई, त्याला प्रजेला न विचारतांच नव्हे, तर प्रजेच्या मताविरुद्ध दशरथानें वनवासास धाडिलें. या उदाहरणा शिवाय दुसरें राजाच्या अप्रतिहत सत्तेचें अथवा स्वैर वर्तनाचें उदाहरण कोणतें देतां येईल? दशरथानें गोड गोड भाषण केलें खरें. पण त्यात अर्थ नव्हता. वनाला राम गेला तो गेलाच. लोकांनीं काय केलें तर मुळमळु ते रडले; त्याच्या पाठी मागून गेले. राम चुकवून त्यांना गेला तेव्हां परत आले.

(पुढें चालेल)

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध ६ शके १८२३

## खानेसुमारी

१८८१ ची खानेसुमारी झाली तेव्हां लोकसंख्या फार वाढली असा सिद्धान्त ठरला होता. ही प्रजावृद्धीची गोष्ट १८९१ च्या खानेसुमारींतही सारख्याच वाढीची दिसून आली आणि या वाढीमुळें ब्रिटिश राज्यांतील शांतता व अबादानीं यांचा मोठा गौरव करण्याचा परिपाठ पडला आहे. या तिसऱ्या दशवार्षिकी खानेसुमारीचें लक्षण सारखेंच राहिलें नाहीं. १९०१ च्या खानेसुमारींत लोकसंख्येची वाढ आहे खरी पण ती मागील अनुभवा प्रमाणें समाधानाची नाहीं. १९०१ च्या खानेसुमारीनें काम फार उत्कृष्ट तऱ्हेनें झालें. १ मार्चच्या रात्रीं एका वेळेला सर्व इंडियाची शिरगणती संपूर्ण झाली ही गोष्ट फार सामान्य नाहीं. ३०।५० घरांचा एक गट करून तो एका माणसाकडे दिला होता; अशा १० गटा पासून १५ गटा पर्यंत एक महला एका सुपरवायझरच्या ताब्यात दिला होता. आणि क्षेत्रफळाच्या मानानें असे महले एकत्र करून गांवाची, तालुक्याची, जिल्ह्याची, व प्रांताची लोकसंख्या घेतली आणि सर्व प्रांतांची लोकसंख्या एकत्र करून सर्व देशाची लोकसंख्या काढण्यात आली. तारीख १ मार्चला सर्व इंडियांत १४,९९,०६,३४९ पुरुष व १४,४३,६९.३५२ स्त्रिया मिळून २९,४२,९६,७०१ लोकसंख्या भरली. १८९१ च्या खानेसुमारींत इंडियाची लोकसंख्या २८,७३,१७,०४८ होती आणि त्या मानानें ६९,४९.६५३ या संख्येनें गेल्या १० वर्षांची वाढ दिसून येते. हें वाढीचें प्रमाण शेकडा २.४१ पडतें परंतु १९०१ सालीं प्रथमच स्वातदरी, चित्रालहिल्स, भामो, काठा, सिकीम, कुरम दरी, टॉची दरी, अंदमान, निकोबार वगैरे भाग इंडियांत सामिल करून त्यांची खानेसुमारी करण्यात आली ह्मणून त्यांची लोकसंख्या कमी केली असतां ८९१ पेक्षां निवळ वाढ ४२,८१,०६९ लोकांची आहे ह्मणजे वाढीचें प्रमाण फक्त शेकडा १.४९ पडतें. १८८१ सालीं जी लोकसंख्या भरली ती त्या नंतरच्या दहा वर्षांत शेकडा ११.२ या प्रमाणानें वाढली ह्मणजे १८८१ साला पेक्षां २,८६,२३,९०२ वाढून १८९१ सालीं २८,७३,१७,०४८ लोकसंख्या भरली वाढीचें प्रमाण फारच उतरलें आहे आणि किंबहुना जी वाढ सर्व इंडिया संबधानें दिसत आहे ती कित्येक मोठमोठ्या इलाख्यांत दिसत नसून उलटी त्या भागांत कमी झाली आहे. सरासरीच्या नियमानें ही थोडीशी वाढ दिसत आहे पण सरासरीचा नियम इंडिया सारख्या अफाट राज्याला लावून एखाद्या मोठ्या इलाख्या विषयीं अनुमान बांधणें मोठ्याच चुकीचें होईल.

इंडियांतील लोकसंख्येची कल्पना वास्तविक यावी ह्मणून आह्मी इंग्रजी खालील व नेटीव संस्थानांतील लोकसंख्येचे आंकडे प्रांतवारीनें देत आहों. ज्या आंकड्या मागें + अधीक चिन्ह असेल तो आंकडा १८९१ च्या लोकसंख्येंत झालेली वाढ दाखवील आणि ज्या आंकड्या मागें – ऋण चिन्ह असेल तो आंकडा १८९१ च्या लोकसंख्येंत झालेली कटती दाखवील.

| प्रांत | १९०१ ची लोकसंख्या | | १८९१ च्या लोकसंख्येंत फरक |
|---|---|---|---|
| आसाम | ६१२२२०१ | + | ६८८५३३ |
| बंगाला | ७४७१३०२० | ± | ३३६६०५९ |
| सिंध | ३२१२८०८ | + | ३४१०३४ |
| ब्रह्मदेश | ९२२११६१ | + | १४५०२६७ |
| कूर्ग | १८०४६१ | + | ७४०६ |
| मद्रास | ३८२०८६०९ | + | २५७८१६९ |
| वायव्य प्रांत व औध | ४७६९१३२४ | + | ७९१५३३ |
| पंजाब | २२४४९४८४ | + | १५८२६३७ |
| म्हैसूर | ५५३८४८२ | + | ५९४८७८ |
| काश्मीर | २९०६१७३ | + | ३६२२२१ |
| मद्रास संस्थानें | ४१९०३२२ | + | ४८९७०० |
| बंगाल संस्थानें | ३७३५७१५ | + | ४३९३३६ |
| वायव्य संस्थानें | ७९९६७५ | + | ७।८४ |
| पंजाब संस्थ नें | ४४३८८११ | + | १७५५३६ |
| अजमीर मेवाड | ४७६३३० | – | ६६०२८ |
| वऱ्हाड | २७५२४१८ | – | १४४६२२ |
| मुंबई | १८५८४४९६ | – | २८८८४६ |
| मध्यप्रांत | ९८४५३१८ | – | ९३८९७६ |
| हैदराबाद | ११७४८९७ | – | ३६२१४३ |
| बडोदा | १९५०९२७ | – | ४६४४६९ |
| रजपुताना | ९८४१०३२ | – | २१७५०७० |
| सेंट्रलइंडिया | ८५०१८८३ | – | १८१६९२९ |
| मुंबइसंस्थानें | ६८९१६९१ | – | ११६७६०७ |
| मध्यप्रांत संस्थानें | १९८३४९६ | – | १७७०१५ |

वरील आंकड्याचें प्रांतवारीनें मनन केलें ह्मणजे आढळून येईल कीं आसाम, ब्रह्मदेश, म्हैसूर, काश्मीर हे भाग खेराज करून बाकीच्या ज्या प्रांतांत वाढ आहे तेथें देखील त्या वाढीचें प्रमाण मागील वीस वर्षांच्या मानानें फारच कमी आहे. गेल्या दहा वर्षांत दुष्काळ, प्लेग, व इतर रोग यामुळें मोठीच मनुष्यहानी झाली आहे. खरोखरच इंडियाची प्रजावृद्धि फारशी वाढली नाहीं किंवा तिची वाढच खुंटली आहे असें निदर्शनास येईल तर आह्मास ती गोष्ट मोठ्या अभिनंदनाची वाटेल. पण वास्तविक प्रकार निराळाच दिसतो आणि आमच्या स्थितींत हाच मोठा दोष आहे. हा दोष लक्ष्यांत घेतला ह्मणजे मनाला मोठा खेद होतो. हा दोष असा कीं इंडियांत जननाची क्रिया फार दांडगी आहे आणि मृत्यूची क्रियाही तितकीच मोठी आहे. या परस्पर विरोधी कार्यामुळें दहा वर्षांच्या खानेसुमारीच्या आंकड्याला लघुपणा येतो. जननाच्या क्रियेला मरणाच्या क्रियेनें संक्षेप मिळतो आणि परिणामीं या बेरीज वजाबाकीची एकुणांत लहानशा संख्येंतच निपटे. ही जननाची अभिवृद्धी मरणाच्या प्रमाणानें छाटली जाते आणि त्यापासून देशाचा मोठा ऱ्हास होतो हें विसरतां कामा नये. प्रस्तुत चालूं असलेली जनन मरणाची क्रिया आमच्या लोकांमधील ओजाचा व वीर्याचा ऱ्हास ध्वनित करिते. हा ऱ्हास देशाच्या लोकस्थितीला मोठा घातुक आहे. आमच्या लोकांस रोजगारधंदा नाहीं. त्यांचा उपासमार फार वेळां होतो, आणि उत्तरोत्तर घोर दारिद्र्यामध्यें आह्मी बुडत आहों तेव्हां अशा कष्टमय स्थितींत जननमरणाची भरती भावी सांपत्तिक ओहटीला सूचित करिते. भावी दशा मोठी संकटाची व कष्टमय आहे असें पाहून मन अगदीं फाटून जाते. आह्मी संपत्तीचें कष्टाळू व मोठे कंटक बनलेंा आहों; पण पुढील मार्ग सुधारण्या विषयीं आह्मी अगदीं गोंधळल्य' सारखे झालें आहों. उर्जित कालाची आशा मोठी आहे. आणि तिच्या सूर्यकिरणांनींच आपण आनदांत कालक्रमणा करितों. हल्लीं देशाची संपत्ति घालविण्याचे सर्व मार्ग खुले आहेत आणि हे मार्ग बंद होऊन सुस्थिति प्राप्त होईल तो सुदिन होय.

स्त्रीपुरुषांचें परस्पर प्रमाण इंडियांत सरासरीनें १०० पुरुषा मागें ९६.२९ स्त्रिया असें पडतें. एकंदरीनें १५ कोटी पुरुष आहेत तर स्त्रिया ५६ लक्षांनीं कमी आहेत. हें अंतर मागील खानेसुमारींत ही दिसून आलें होतें. एकंदर गोळाबेरजेनें पाहतां पुरुषा पेक्षां स्त्रियांची उत्पत्ति कमी दिसते. इतर राष्ट्रांच्या आकड्यांशीं हें प्रमाण ताडून पाहण्यासारखें आहे.

## न्यायाची गादी

दुष्कृत्याचा परिस्फोट होईल तितका जगाला पाहिजे आहे परंतु तो गोष्ट जनसमाजाच्या रचनें वरून व्हावी तितकी साध्य मात्र होत नाहीं. या परिस्फोटाचें काम बहुत कठिण असतें आणि तें यथायोग्य रितीनें करण्याची कुशलता व चतुरस्त्रता फार थोड्या गृहस्थास असते. साधारण व्यवहारांत दुष्कृत्याचा स्फोट करण्या पेक्षां चांगुलपणा तेवढा घ्यावा आणि बाकीच्या दुर्गुणा विषयीं मौन धरावें हा नियम विशेष सुखावह व फलप्रद होतो. परंतु ही साधारण जनरितीची गोष्ट न्याय दरबारांत त्याज्य होईल आणि तेथें सत्याचें अन्वेषण व दुष्कृत्याबद्दल शासन ह्याच गोष्टी मुख्यतें करून करावयाच्या असतात. न्यायाधीशाची गादी ह्मणजे देवाची गादी होय; पण त्या दरबारांतही पुष्कळ प्रसंगीं भीड व वशिला चालतो तेव्हां मोठे पातक घडत असतें. जो नरश्रेष्ठ ईश्वराच्या गादीला धैर्यपणा राखतो आणि तसें करितांना जो जग तृणवत् लेखतो तो न्यायाधीश खरा, प्रामाणिक व निस्पृह होय. अशीं माणसें थोडीं असतात आणि तशा विरळ व शहाजोग रत्नाचा सुदैवानें लाभ झाला ह्मणजे मनाला मोठी धन्यता वाटते. मि. पेनेल हे या उत्तम कोटींतले गृहस्थ आहेत. असा सद्गुणी सत्पुरुष जेव्हां आपल्या न्यायाच्या कार्यबाहुल्यांत सरकारच्या इतराजींत येतो तेव्हां तर लोकांची सहानुभूती तिक्याच प्रमाणानें बहुगुणित होते. मि. पेनेल हे बंगाल्यांतील नोवाखलीचे सेशन जज्ज आहेत यांनीं एका खुनाच्या खटल्यांत पोलीस सुपरीनटेंडेन्ट साहेबांचा खोटेपणा देखील छपूं दिला नाहीं. खुनी आरोपीला शिक्षा दिली आणि पोलीसचे सुपरिनटेंडेंट मि. रेली व त्याचे सहचर कांहीं अधिकारी याजवर खोट्या साक्षी बद्दल व बनावटी पुराव्या बद्दल मोकद्दमे केले आहेत. मि. पेनेल हे मागें छपराच्या खटल्यांत सरकाराच्या मर्जीतून उतरले होते पण त्या गेरमर्जीला न जुमानतां

त्यांनीं एका खुनी मोकदम्यांत खरे अपराधी शिक्षेंत काढले व त्यांचा बचाव करणार पोलिस अम्मलदारावर खटले केले. सुपरिन्टेंडेन्ट मि. रेली यांस तुरुंगांत ठेविलें व जामीनावर खुलें केलें नाहीं ह्मणून बंगाल्यांत मोठा गलबला झाला आहे. मि. पेनेल यांनीं खुनी खटल्याचा फैसला ३०० पृष्ठें लिहिला आहे आणि तो सांगण्याला पांच तास लागले. मि. पेनेल यांनीं पुष्कळच गोष्टी बाहेर आणिल्या आहेत परंतु पुढें हे खटल्याचे कागद हायकोर्टाकडे दाखल करण्यासाठीं ते स्वतां कलकत्यास गेले व तेथें कांहीं हुकूम तोडला अशा सबबीवर ते सध्यां बडतर्फ आहेत. कलकत्याच्या हायकोर्टापुढें हें प्रकरण सध्यां चालूं आहे तेव्हा आह्मी या बाबतींत अधीक लिहूं शकत नाहीं. आह्मी इतकेंच इच्छितों कीं न्यायबुद्धीचे मि. पेनेल सारख्या अधिकारी अधीक राजमान्य होऊन त्यांचा इतर न्यायाधीशांस कित्ता मिळो !

## इंडियाची सनद

इंडियाच्या हक्काची सनद ह्मणजे महाराणी सरकारचा १८५८ चा जाहिरनामा होय. या जाहिरनाम्यातली अभिवचनें पाळण्यापेक्षां तीं युक्तीप्रयुक्तीनें झुगारण्यांतच सर्व राज्यकर्त्यांचा मुत्सद्दीपणा दिसून येतो. मध्यंतरीं असेंहि गंडातर आलें होतें कीं या सनदेच्या आधारें हक्क ह्मणून सर्वच गोष्टी इंडियन प्रजेला मागतां येणार नाहींत. जाहिरनामा हा केवळ गौरवात्मक आहे आणि त्याचा अर्थ फारसा लांबविण्यांत येऊं नये. लार्ड कर्झन यांच्या भाषणांतील कांहीं बोला वरून असा गैरसमज झाला होता आणि त्या जाहिरनाम्या नंतरच्या इतिहासानें खरासा अनुभवाला आला ह्मणून मोठी भिती वाटली होती परंतु जाहिरनाम्याला खरोखर तिलांजली देण्याचा सरकारचा विचार दिसत नाहीं. कृतीमध्यें या सद्विचाराला प्रतिकूळ गोष्टी घडत आहेत तथापि इंडियन लोकांची ही सनद हिरावून घेण्याचा संकल्प नाहीं असें आह्मी पक्केपणीं कळवितों. खुद्द बादशहा एडवर्ड हे मातोश्रीच्या सनदेला मोठा मान देतात आणि ते या सनदेचा खरेपणा आपल्या कारकिर्दीनें विश्रुत करितील अशी आह्मांस उमेद आहे. व्हिक्टोरिआ अजबखाना बांधल्या नंतर त्यांत काय काय योजना होतील हें सांगतांना लार्ड कर्झन ह्मणाले कीं या दिवाणखान्याच्या भिंतींतल्या संगमरवरी शिलेवर किंवा धातूच्या पत्र्यावर सोनेरी अक्षरानीं इंग्रजींत व देशी भाषांत १८५८ चा जाहिरनामा लिहून ठेवण्यांत येईल. ईश्वर करो आणि या जाहिरनाम्यासाठीं निदान हा अजबखाना उभा राहून सर्व जगाला थक्क करो आणि इंडियनांना यांचे सर्व हक्क मिळवून देवो !

## The Berar Samachar

MONDAY MARCH 25 1901

The budget estimates for 1901-2 are of a hopeful prospect and the Government are again in a position to look forward to the early dawn of a period of considerable prosperity. The version of the Government is all cheerful and gratifying. The results of the famine are such as to leave a memorable record in the history of mankind and the economic progress is fast improving in the return of the recuperative power of the people. This is indeed a matter of congratulation if it were the only side of the picture of India. There is however the dim side wherein we shall find a tale of misery. The condition of the people is far from satisfactory. It is a marvel that in a country like India there should be so much poverty side by side with the treasures of natural resources and the mineral wealth. Two extremes never co—exist but here in India there exists an immense amount of misery along with the vast riches of the national credit. This poverty is a fact and it is also a fact that India is an epitome of the world. All sorts of climates, different natures of the soil and vast possibilities of an industrial life form the peculiar feature in the material prosperity of the country. So much of misery with so much of wealth is a strange phenomenon. Such a state of things we shall hardly find in any other country of the world. In India it is possible because there seems to be a queer principle of division whereby the people of the soil are to enjoy the lot which helpless and indebted people must have in competition with their rulers who turn to their advantage all the resources and successfully drain off the wealth the country. We do not think of fighting over the matter but our only point is to awaken our people to the new exigencies of life and to preach the great principles of self—help and self-sacrifice. In neither of these principles we seem to have made an honest progress. From the sad experience of the last famine we have grown to endure misery in a noble and chivalrous manner. The spirit of fortitude has come home to us; but we have not thrown off the lethargy of old times and have not realized the hard strain and the full extent of the poverty that threatens to throw our people into a state of civilized slavery. All ideas of the recuperative powers of the people are more or less a dream. The figures of the last census have proved the falsity of the stock arguments that found a place in the assumption of prosperity, peace and safety of the British rule. The total population is decreasing; and death seems to be very busy in cutting down the high figures of births. There is no staying power with the people. There is a famine of wages in in India. No adequate employment is available for the labour that wastes away in the land. The wage-famine is wholly due to the utter absence of an industrial and commercial life in India. The trade of exports and imports that flourishes in the land is finally for advancing the wealth and prosperity of the rulers alone.

India is thus a nation of people beset with misery and poverty. The extent of their indebtedness has driven them to a condition of labourers in the field. They have lost all credit and have hardly a hope of getting rid of the horrors of usury. There is no other industry besides agriculture. There is no great middle class who will invest a large capital in improving the agriculture of the country. The absence of an industrial and commercial life has a deteriorating effect; and this state of things produces the famine of wages. Agriculture shows signs of decay for want of capital and want of improved methods which scientific appliances have brought in vouge. There is thus a double difficulty. And when we shall get over it we shall not have the present wage-famine and the ill condition into which agriculture is drifting. The institution of an agricultural bank is the first stepping stone It will give some rest to the indebted peasants and open to them a prospect of honest and lucrative income for their share of labour. and we hope that this small measure will turn their eyes to new openings of labour. The larger programme of industrial schools and commercial houses is a royal task and we hope that a methodical begining in imparting the technical education will go a long way to improve the present matters. A class of agriculture is also the great desideratum of the day. The educational course requires a simplification and it should be such as will enable the people to master the first rudiments of knowledge and to prepare them to attend to a partieular art at an early stage of life when they are 18 or 20.

## वऱ्हाड

राजे इंद्रकरण साहेब बहादूर, आनररी असिस्टंट कमिशनर यांस, प्रकृतीची अस्वस्थता दूर करावी व विश्रांती घ्यावी ह्मणून एक महिन्याच्या रजेवर थंड हवेंत गेले आहेत. त्यांस असिस्टंट कमिशनरचे सर्व मुलकी अधिकार देण्यांत आले आहेत हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो.

मे. रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटीकमिनर यांस २ महिने व ३० दिवस या मुदतीची हक्काची रजा देण्यांत आली आहे. त्यांच्या रजेंत मे. मोडो साहेब रजेवरून परत येऊन आकोल्यास डिपुटी कमिशनर होतील असें ह्मणतात.

वाशिम, खामगांव, शेगांव इलिचपूर शहर, परतवाडा, कारंजा व यवतमाळ येथील मुनासिपालिट्यांनीं तारदखान्या संबंधी नवीन नियम केले आहेत.

इलिचपूरचे डिपुटी इनस्पेक्टर रा० रा० लक्ष्मण गोविंद ऋषी हे पुढील महिन्यापासून पेनशन घेणार आहेत. त्यांच्या पेनशनदारी मुळें खालील बदल्या देण्यांत आल्या आहेत:–

| रा. रा. | डिपुटी इनस्पेक्टरीचा वर्ग | व पगार |
| --- | --- | --- |
| गोपाळ रामचंद्र पिटके, बी. ए. आकोला. | १ ला. | २०० रु. |
| हरी मोरेश्वर शेवडे, प्रिन्सीपाल ट्रेनिंग कालेज. | २ रा. | १५० रु. |
| श्रीधर रामचंद्र पिंपळखरे, बुलढाणा. | ३ रा. | १२५ रु. (कायम) |
| रामचंद्र सदाशिव लेले बी. ए. | ३ रा. | १२५ रु. (सबप्राटेम) |

राजश्री लेले हे मलकापूरच्या शाळेवर हेडमास्तर आहेत. त्यांस इलिचपूर जिल्ह्याचे डिपुटी इनस्पेक्टर नेमण्यांत आलें.

### नोटीस

बेशमी– सारजी मर्द लक्ष्मणसिंग परदेशी क्षत्री राहणार नांदखेडे परगणे पंचगव्हाण तालुका आकोट यांस:––

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी भावजय आहेस: लक्ष्मणसिंग हा अविभक्त व समाइक असतांनाच मरण पावला परंतु तुझ्या अन्नवस्त्राबद्दल ह्मणून मी १२०० रुपयांस मौजे नांदखेडे येथील सर्व्हे नंबर २२ व २५ पैकीं अशीं दोन शेतें विकत घेऊन त्याची खातीं मेहरबान तहशिलदार, आकोट यांच्या कडून तुझ्या नांवानें करून दिलीं. आतां असें कळतें कीं तूं आपल्या भावाच्या फंदाला लागून तीं शेतें विकूं पाहत आहेस. तुला ती विकण्याचा अखत्यार नाहीं. तूं अन्नवस्त्राची मालकीण आहेस. या उपर तूं विक्री करशील तर सर्व नुकसान तुझ्या कडून व खरेदी घेणारा कडून भरून घेतलें जाईल. कळावें. तारीख २४।३।१९०१ इ०

सही

लाल माधोसिंग वल्लद सरदारसिंग
क्षत्री राहणार नांदखेडे
निशाणी खुद्द.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं आकोट तालुक्यांतील मौजे नांदखेडे येथील सर्व्हे नंबर २२ व २५ पैकीं हीं दोन शेतें माझी भावजय नामें सारजी मर्द लक्ष्मणसिंग इच्या नांवानें आहेत तरी तिची त्या शेतीवर काहींच मालकी नसून तिला तीं विकण्याचा वगैरे अखत्यार नाहीं. जो कोणी तिच्याशी खरेदीचा किंवा गहाणाचा व्यवहार करील तो स्वता जबाबदार राहील आणि इस्टेटीवर कांहींच हक्क चालणार नाहीं. संपूर्ण मालकी खालीं सही करणार याची आहे. ता० २४ माहे मार्च सन १९०१ इ०

सही

लाल माधोसिंग वल्लद सरदारसिंग
वस्ती नांदखेड निशाणी
खुद्द.

## वर्तमानसार

चिनात जंगी लढाईच्या तयाऱ्या इंग्लंडाला लौकरच कराव्या लागतील असें स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं कामन्स सभेंत बोलून दाखविलें.

रंगून येथें टेकनिकल कालेजाची नवी इमारत बांधण्यास थोडे दिवसांत आरंभ होणार असून सदर इमारतीकरितां अडीच लक्ष रुपये खर्च करण्याची मंजुरी मिळालेली आहे.

अयोध्या प्रांतांतील प्रसिद्ध हायकोर्ट बाबू लक्ष्मणदास यांनीं राणीच्या नांवानें एक लाख रुपये काढून त्याच्या व्याजांतून ब्राह्मणांस व क्षत्रियांस दरसाल पन्नास स्कालरशिपा देण्याचा आपला विचार प्रसिद्ध केला आहे.

राजास दंड—पंजाबच्या गेल्या वार्षिक रिपोर्टवरून असें समजतें कीं बुशा संस्थानांत डेपुटी कमिशनर साहेबांची स्वारी गेली असतां तेथील राजेसाहेब सदर साहेबबहादुरास भेटावयास गेले नाहींत ह्मणून ह्या राजे साहेबांस एक हजार रुपये दंड करण्यांत आला.

सक्तीचे नियम—शांघाई येथें छापखान्यांतील काम करणारे प्रिंटर, कंपॉझिटर वगैरे लोकांबद्दल फार सक्तीचे नियम आहेत. तेथें एक कंपॉझिटर मालकास न विचारितां दुसऱ्या छापखान्यांत कामास गेला ह्मणून त्याला २०० ठोंसे व एक महिन्यांची कैद झाली असें समजतें.

सालिसिटरास जोड्याचा मार—कलकत्ता येथील हायकोर्टांतील वकील मि. ह्यूम सरकारी सालिसिटर हे एका घरफोड्या आरोप्यावर कोर्टांत काम चालवीत असतां आरोपी पिंजऱ्याचे बाहेर येऊन त्यानें सालिसिटर साहेबावर हल्ला करून जोड्याचा यथेच्छ मार दिला. या आरोपाची चौकशी संक्षिप्त रीतीनें होऊन आरोपीस तीन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा देण्यांत आली.

गर्भधारणा शक्ती नष्ट झाली— 'तेन' या गांवचें पाणी बरेंच बिघडल्याचा बोभाटा झाला आहे. हा गांव बडोदे प्रांतांत बराच प्रसिद्ध आहे. येथें पाणी बिघडल्यामुळें पांच सहा वर्षांपासून स्त्रियांची गर्भधारणाशक्ति नष्ट होऊन गेली असल्याचें समजतें आज पांच सहा वर्षांत त्या गांवांत एकही स्त्री गर्भवती झाली नाहीं. अर्थात् तेथे लहान मुलें हल्लीं बिलकुल नाहींत असें ह्मणतात.

शाळेंतील एका मुलीस हिंदुस्थानचें खाद्य काय असा एकानें प्रश्न विचारला तेव्हां तिनें 'दुष्काळ' असें उत्तर दिलें. त्या मुलीला तिच्या ह्मणण्याचा अर्थ जरी बरोबर समजला नसला तरी ती जें बोलली तें अगदीं खरें बोलली असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

चार चार बोटांच्या पंज्यांचीं माणसें—थोडे दिवसांपूर्वीं अकरा भाऊ आस्ट्रेलियांतून ब्लॉण्डिक येथें गेले. ते शरिरानें केवळ राक्षसच आहेत. यांचें आडनांव बीम असें आहे. स्टेशनावर त्यांना पाहण्यासाठीं लोक उभे होते. अकराही असामींची उंची प्रत्येकीं ६ फूट ९ इंच आहे. त्यांचीं आईबापें फारशीं उंच नाहींत. व लठ्ठही नाहींत व त्या दोघांच्याही हातांस चारचारच बोटें होतीं. करंगळी मुळींच नव्हती आणि या अकरा भावांच्या दोन्ही हातानाही चारचारच बोटें आहेत. यांच्या आज्या पणज्यांनाही चारचारच बोटें होतीं असें ह्मणतात. ज्ञा० च०

पावतीच्या टिकिटाबद्दल पोष्टाच्या टिकिटांचा उपयोग केला तर कां चालूं नये अशी कलकत्याच्या व्यापाऱ्यांनीं तकरार काढली आहे.

हल्लीं विश्व विद्यालयांत घेतल्या जाणाऱ्या सर्व परीक्षा बंद करून नोकऱ्या मागणारा साठीं मात्र स्वतंत्र परीक्षा घेण्यांत येणार आहे अशी वंदंता आहे. धा.

दुष्काळामुळें २७००० मुलें ख्रिस्त्यांच्या आश्रया खालीं गेलीं आहेत!

डेराडून जिल्ह्यांत एका कुटुंबांत एक १३९ वर्षांचा इसम आहे. बाकी ऐंशीं वर्षांच्या वयाचे आहेत.

मद्रासकडील एका ईग्रज कलेक्टरानें एका रजपूत स्त्रीबरोबर लग्न लाविलें. दे०

युरोपियन लोक हिंदुस्थानांत आले ह्मणजे त्यांची प्रकृति फारच नाजुक बनते. पुण्याच्या स्टेशनाजवळ एका नेटिवाची असलेली सुतारेशमाची गिरणी रोज सकाळ संध्याकाळ दहा पांच मिनिटें ओरडते तें त्रास जवळच रहात असलेल्या एका जंगल अधिकाऱ्यास सोसवला नाहीं. याबद्दल फिर्याद होऊन गिरणीच्या मालकास कांहीं वर्षांपूर्वीं दंड झाला.

कालिकत जिल्ह्यांत चौघाट येथें श्री कालिकादेवीच्या मंदिरांत वार्षिक उत्सवानिमित्त नेहमीं प्रमाणें वाद्यें वाजत होतीं; त्या मंदिराशेजारीं नदी पलीकडे एक युरोपियन माजिस्ट्रेट उतरले होते. त्यांच्या नाजुक प्रकृतीला हा वाद्यघोष सहन झाला नाहीं. सबब त्यांनीं वाद्यें बंद करण्याचा हुकूम फरमाविला, हिंदु लोकांचीं धर्मकृत्यें वाद्यानें होत असल्यामुळें व धर्मकृत्यांत हात घालण्यास कायद्यानें कोणासही अधिकार पोंचत नसल्यामुळें उत्सवाच्या पुढारी लोकांनीं सदर हुकूम ऐकला नाहीं. तेव्हां साहेबाची तबियत फारच गरम झाली व साहेब बहादूर हातांत चाबूक घेऊन श्री कालिका देवीच्या देवळांत घुसले व त्यांनीं तेथील एका गृहस्थास चाबकाखालीं यथास्थित चोपलें, गोरें कातडें पाहून बिचारे काळे लोक भिऊन स्वस्थ राहिले. गोऱ्या लोकांच्या तबियती आमच्या धर्मकृत्यांच्याही अशा तऱ्हेनें आड येऊं लागल्या, याचा विचार सरकारनें करून त्याचा अवश्य बंदोबस्त करावा अशी आमची त्यांजवळ विनंती आहे. मे० वृ०

## लग्नाचा फार्स.

पंतांची किन्हई येथील राहणारे महादेव मार्तंड पुराणिक या नांवाचे एक गृहस्थ वयानें सुमारें साठ पासष्ट वर्षांचे आहेत. त्यांच्या मनांतून आज फार दिवस आपलें स्वतःचें लग्न करण्याचें होतें. या गृहस्थास पहिल्या बायकोपासून तीन मुली झालेल्या हयात आहेत. त्यापैकीं दोन लहान मुलींचीं लग्नें त्यानें केलीं आहेत. सर्वांत वडील मुलगी सुमारें चोदा वर्षे वयाची असून अविवाहित ठेविली आहे. असें करण्यांत कांहीं विशेष हेतु असावा असें दिसतें. कदाचित् या आमिषावर आपल्यास कोणी तरी मुलगी देण्यास तयार होईल असें त्यास वाटत असलें पाहिजे. या मुलीच्या लग्नाबद्दल पूर्वी एकदां सेशनपर्यंत फौजदारी खटला झाला होता. सातारा येथें मंदे या आडनांवाचे तिघे बंधु आहेत. यांची एक बहीण अविवाहित आहे तेव्हां या होतकरू वृद्ध नवरदेवांनीं आपली स्वतःची मुलगी त्या तिघांपैकीं वडील भावास देऊं करून त्यांची बहीण त्यानें आपल्यास द्यावी असें ठरविलें. हा वडील भाऊ लंगडा असून वेडसर आहे. त्या मुलीच्या आईसही आणखी कांहीं पैसे देऊं केले होते. या प्रमाणें सर्व ठराव होऊन प्रथम या म्हातारे बोवांचें लग्न उरकून घेऊन मग मंदे यांचें लग्न होणार होतें. या एकंदर कृत्यास त्या मुलीच्या तिघा भावांपैकीं एका भावाची पहिल्यापासून संमति नव्हती. पण त्यास न जुमानतां बाकीच्या मंडळींनीं लग्न समारंभास सुरवात केली. सप्तपदीपर्यंत सर्व विधी झाले. आपल्यास न जुमानतां ही मंडळी सर्व लग्न शेवटास नेणार अशी खात्री झाल्यामुळें तो बेफाम झाला, त्यानें आपली बहीण पळविली. भोंवल पाडून टाकलें. वस्त्रा फोडल्या. या प्रमाणें जिकडे तिकडे दंगा झाल्यावरीवर फौजदार व मॅजिस्ट्रेट यांजकडे वर्दी गेली. नवरामुलगा मंडावळ्या बांधलेला, नवरी मुलगी व इतर वऱ्हाडी मंडळी फौजदार कचेरींत जमा झाली. त्या मुलीच्या भावानें असें स्पष्ट कळविलें कीं, मला फांशीं दिलें तरी चिंता नाहीं पण या म्हाताऱ्यास माझी बहीण देऊन तिचें जन्माचें नुकसान करण्यास मी तयार नाहीं. शेवटीं लग्नापैकीं पुढील विधि सर्व जागच्या जागीं राहून हल्लीं ते वृद्ध नवरदेव आपल्या गांवीं गेले. नवरीमुलगी तिच्या भावानें नेली. आतो असें समजतें कीं, त्या नवऱ्या मुलीच्या आईनें आपल्या मुलांवरच सिटी मॅजिस्ट्रेटकडे फौजदारींत फिर्याद केली आहे.

सध्यां दक्षिण आफ्रिकेंत सुधारणेच्या नांवाखालीं पाश्चिमात्य सुधारणेस लांछन आणणारीं अनन्वित कृत्यें चाललीं आहेत. धान्यसामुग्री, कडबा वगैरे सर्व जाळून खाक करतें व गाई, ह्मशी, बैल, रेडे, घोडे वगैरे जनावरें पकडावींत व घरांत राहणारे लोकांस अन्नसामुग्री मुळींच ठेवूं नये, असा सक्त हुकूम लार्ड किचनर यांनीं सोडला आहे. ज्या घरांत फक्त बायका व पोरकीं पोरें आहेत त्यांसही हा नियम लागूं केला आहे. असाही हुकूम सोडला आहे कीं, कोणाही बोअर शिपायास कैद करावयाचे नाहीं, परंतु गोळ्या घालून ठार करावयाचे ह्मणजे वाईट रीतीनें वागविल्या बद्दल तकरारी तरी बाहेर जावयास नकोत. बोअर लोकांचीं घरें, मग त्या घराचे मालक इंग्लिशाचे विरुद्ध लढत असोत कीं नसोत, लुटून फस्त करावींत असा इंग्लिश शिपायास हुकूम आहे. इंग्लिश शिपायांनीं डलस्टूम नांवाच्या एका सुंदर शहराचा जाळून नाश केला. त्यांत फार सुंदर इमारती व बागबगीचे होते. घरें लुटून फस्त करावयाचीं व नंतर त्यांस आग लावावयाची अशा तऱ्हेनें जळत असलेल्या घरांपासून निघणाऱ्या ज्वाळा व धूर ९० मैलपर्यंत दिसत होता. अशा रीतीनें एकून एक घर जाळून खाक केलें. एकंदरींत भूतदया, सुधारणा, न्यायप्रियता इत्यादि गोष्टी संबंधाच्या युरोपियन लोकांच्या वल्गना व प्रत्यक्ष त्यांच्या कृती यांत किती जमीन अस्मानीचें अंतर असतें, हें या वरून चांगलें दिसून येतें. प्रे०

### नोटीस

रा. रा. सिताराम वल्लद सखाराम पाटील वाघ राहणार बेराळें बुनरूख तालुके जळगाव जिल्हे आकोलें यास:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची मुलगी सेवंती ही आमचा मुलगा पंढरी याची लग्नाची बायको असोन लग्न होण्यास अजमास ६–७ वर्षें झालीं आहेत. हल्लीं तीन वर्षांत मुलीस आणण्याकरितां बरेच वेळा पाठविलें असतां तुह्मी पाठविलें नाहीं. मुलीचे अंगावर दोनशें तोळे चांदी असून दहा तोळे सोन्याचे दागिनें आहेत. सदरहू दागिने पहातां मुलीचे अंगावर दिसत नाहींत. ह्मणून तुह्मास नोटीस देण्यात येते कीं मुलगी तिचे अंगावर असलेले सर्व दागिन्यासह, नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आमचे घरीं पोहचती करावी. तसें न केल्यास तुमचेवर योग्य कोर्टांत दावा केला जाईल. मुलीस ज्या ज्या वेळीं आणण्याकरितां पाठवितो त्या त्या वेळीं मुलगी लपवून ठेवितां हें चांगलें नाहीं. मुलीस आणण्याकरिता आमचेकडून वरचेवर मनुष्य येत असतां तुह्मी पाठवीत नाहीं त्यामुळें मुलीचें अन्नवस्त्राबद्दल तुमचा दावा मुळींच चालणार नाहीं. हल्लीं नोटीसी प्रमाणें मुलगी दागिन्यासह वरील मुदतींत न पाठविल्यास नोटीसीचे खर्चासुद्धां तुमचेवर फिर्याद केली जाईल हे पक्कें लक्षांत ठेवावें. कळावे तारीख २३।३।१९०१ इसवी.

सही

रावजी वल्लद आकाजी पाटील
मौजे सावळें प्रगणे जामोद
तालुके जळगांव जिल्हा
आकोलें.

भारतधर्म

**सर्वांस फुकट**

(आबालवृद्धांना उपयुक्त मासिक पुस्तक.)

सनातन भारतधर्ममहापरिषदेच्या हेतूप्रमाणें धर्म–नीतिज्ञानाचा विस्तार, बोध व करमणुक हीं सुलभ रीतीनें होण्याकरितां 'मनोविमार्गगमंडळी'च्या कित्येक वर्षांच्या परिश्रमानें हें मासिक पुस्तक सुरू होणार. शके १८२३ च्या चैत्रापासून दरमहा निघणार.

या प्रथमवर्षी, पांच हजार प्रतींस वर्गणीदार होईपर्यंत फुकट! पुढच्या वर्गणीदारांना वर्षास टपालसह वर्गणी १ रु० ह्मणून मागविण्याची त्वरा करा!

मुंबई—नवानागवाडा.

म्यानेजर.
आर्यभिषक्.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.